आजचे पंचांग
बुधवार, दि. ४ मार्च २०२६
द्वितीय परार्ध, श्वेतवाराह कल्प, वैवस्वत मन्वंतर, युगाब्द ५१२७, शालिवाहन शक १९४७, विक्रम संवत २०८२, विश्वावसुनाम संवत्सर, उत्तरायण, वसंत ऋतु, फाल्गुन मास, कृष्णपक्ष, प्रतिपदा संध्याकाळी ४-४९ पर्यंत
दिवस नक्षत्र- पूर्वाफाल्गुनी सकाळी ७-३९ पर्यंत,
योग- धृति सकाळी ८-५२ पर्यंत.
चंद्र रास- सिंह दुपारी १-४६ पर्यंत

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 बुधवार, दि. ४ मार्च, २०२६ वर्ष - १ अंक - १५९ पाने - ४
पुणे/पिंपरी-चिंचवड

## शेतकऱ्यांना मोठा दिलासा!

**पुणे:** जमिनींना आलेला सोन्याचा भाव, हद्दीचा वाद, सातबारा उताऱ्यामधील चुका आदी कारणांमुळे तहसीलदार, प्रांताधिकारी, अतिरिक्त जिल्हाधिकारी आणि अतिरिक्त विभागीय आयुक्त अशा अधिकाऱ्यांकडे दाव्यांची संख्या वाढत आहे. नागरिकांना निकालासाठी एका अधिकाऱ्याकडे वर्ष -दोन वर्षे वाट पाहावी लागते. या पार्श्वभूमीवर प्रलंबित दावे तीन महिन्यांत निकाली काढण्याच्या सूचना महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

## सारांश वृत्त

### जेएन टाटा यांची जयंती साजरी

**जमशेदपूर (झारखंड):** उद्योगपती आणि परोपकारी जमशेदजी नुसेरवानजी टाटा यांची १८७ वी जयंती मंगळवारी झारखंडमधील जमशेदपूर येथे साजरी करण्यात आली. मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी या प्रसंगी जेएन टाटा यांचे स्मरण केले. "देशाला औद्योगिक प्रगतीचा मार्ग दाखविणारे टाटा समूहाचे संस्थापक जमशेदजी टाटा यांच्या जयंतीनिमित्त मी त्यांना शंभर कोटी प्रणाम करतो, असे त्यांनी म्हटले.

### लष्कराने घेतला सुरक्षेचा आढावा

**श्रीनगर:** उत्तरी लष्कराचे कमांडर लेफ्टनंट जनरल प्रतीक शर्मा यांनी मंगळवारी काश्मीरमधील विकसित होत असलेल्या सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेतला. एक्स वरील एका पोस्टमध्ये, नॉर्दर्न कमांडने म्हटले आहे की लेफ्टनंट जनरल शर्मा यांनी सध्याच्या सुरक्षा परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी फॉर्मेशन कमांडर्स आणि भगिनी संस्थांच्या प्रतिनिधींशी चर्चा केली. काश्मिर खोऱ्यातील वाढत्या सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी आर्मी कमांडरएनसी लेफ्टनंट जनरल प्रतीक शर्मा यांनी श्रीनगर येथे एका बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवले.

### फोन टॅपिंगचे आरोप फेटाळले

**बेंगळुरू:** डीके शिवकुमार यांची हेरगिरी करण्यासाठी फोन टॅपिंग केल्याच्या आरोपांवर विरोधकांवर प्रत्युत्तर देताना, कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांनी हे आरोप "असंतुष्ट आत्म्यांची हताश विधाने" असल्याचे म्हटले. त्यांच्या आणि शिवकुमार यांच्यातील दुरावा दाखविण्याच्या प्रयत्नांना नकार देत सिद्धरामय्या म्हणाले की त्यांचे नाते मजबूत आहे आणि अशा आरोपांमुळे त्यांच्यावर कोणताही परिणाम होणार नाही.

इराण वाटाघाटीस तयार; अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प म्हणाले आता उशीर झाला

# जागतिक तिसरे विश्वयुद्ध थांबणार?

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**तेहरान :** अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्ष जसजसा तीव्र होत आहे, तसतसा वाटाघाटीचा प्रयत्न देखील उजेडात येऊ लागला आहे. इराणकडून सन्मान आणि स्वाभिमान राखण्याच्या अटीसह चर्चेसाठी तयार असल्याचे संकेत मिळाले आहेत, तर अमेरिकेच्या बाजूने ही तयारी उशीर झाल्याचे स्पष्ट केले आहे. या भूमिकांमुळे जागतिक राजकारणात नवीन वळण आले असल्याचे विश्लेषक सांगतात.

इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, "आम्ही चर्चेसाठी तयार आहोत, परंतु आदर आणि स्वाभिमान राखण्याच्या अटीवरच यामध्ये सहभागी होऊ." ही भूमिका युद्धाच्या गंभीर पार्श्वभूमीवर महत्त्वाची मानली जात आहे. युद्धाने दोन्ही देशांच्या राजकीय आणि लष्करी ताकदीवर मोठा प्रभाव टाकला असून, इराणकडून कोणत्याही प्रकारची 'सुटकेची वाट' साधण्यापूर्वी अटी लावल्याचेही सूत्रांकडून सांगितले जाते.

दुसरीकडे, अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पोस्ट करत म्हटले की, "इराणची हवाई संरक्षण, हवाई दल, नौदल आणि नेतृत्व कमकुवत झाले आहे. ते आता बोलण्याची इच्छा व्यक्त करत आहेत. परंतु मी म्हटले 'उशीर झाला!'" ट्रम्प यांच्या म्हणण्यानुसार चर्चेसाठी तयार होण्याआधीच परिस्थिती नियंत्रणाबाहेर गेली असून युद्धाने ठळक परिणाम केले आहेत.

या पोस्टमध्ये ट्रम्प यांनी एका माध्यमात प्रकाशित झालेल्या मार्क थिसेन यांच्या लेखाची लिंक शेअर केली आहे. लेखात असा युक्तिवाद केला आहे की, अमेरिकेची ही कारवाई नव्या "अखंड युद्धाची" सुरुवात नाही, तर ४७ वर्षांपासून चालत आलेल्या अमेरिका-इराण संघर्षाचा परिपाक आहे. लक्षित हवाई हल्ल्यांमुळे इराणचे लष्करी आणि राजकीय नेतृत्व कमकुवत करता येईल आणि भूसैनिक पाठवण्याची गरज भासणार नाही, असे लेखात नमूद केले आहे.

विशेषज्ञ म्हणतात की या रणनीतीला 'ट्रम्प डॉक्ट्रीन' असे संबोधले जात असून, यात आर्थिक निर्बंध, राजनैतिक दबाव आणि लक्षित लष्करी कारवाई यांचा संगम केला जातो. मध्यपूर्वेतील परिस्थिती आता अधिक संवेदनशील बनली असून, या संघर्षाच्या पुढील टप्प्याचे जगभर लक्ष ठेऊन निरीक्षण करत आहे.

या पार्श्वभूमीवर भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गेल्या ४८ तासांत आखाती देशांतील पाच राष्ट्रप्रमुखांशी दूरध्वनीवरून चर्चा केली. त्यांनी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू आणि संयुक्त अरब अमिरातीचे अध्यक्ष शेख मोहम्मद बिन झायेद अल नाह्यान यांच्याशी संवाद साधून भारतीय समुदायाच्या सुरक्षेचा आढावा घेतला. तसेच बहरीनचे राजा हमद बिन अल खलिफा, सौदी अरेबियाचे क्राउन प्रिन्स मोहम्मद बिन सलमान आणि जॉर्डनचे राजा अब्दुल्ला द्वितीय यांच्याशीही चर्चा केली. या कठीण परिस्थितीत संबंधित देशांशी समन्वय राखत भारतीय नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्याचे आश्वासन पंतप्रधानांनी दिले आहे.

# दक्षिण इराणमध्ये ४.३ तीव्रतेचा भूकंप

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**तेहरान :** युद्धाच्या छायेत असलेल्या इराणवर निसर्गाचा प्रकोप कोसळल्याचे चित्र असून दक्षिणेकडील 'गेराश' भागात ४.३ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाला आहे.

भूकंपाचा केंद्रबिंदू जमिनीखाली सुमारे १० किलोमीटर खोलीवर असल्याचे नमूद करण्यात आले आहे. गेराश हा भाग दक्षिण इराणमधील ऊर्जा प्रकल्प, बंदरे आणि लष्करी तळांना जोडणाऱ्या महत्त्वाच्या कॉरिडॉरवर स्थित असल्याने या घटनेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

गेराशपासून अंदाजे १५० ते १८० किलोमीटर अंतरावर गचीन युरेनियम खाण असून ती इराणच्या प्रमुख युरेनियम स्त्रोतांपैकी एक मानली जाते. तसेच बुशहर अणुऊर्जा प्रकल्प गेराशपासून सुमारे २५० ते ३०० किलोमीटर नैऋत्य दिशेला आहे. सुदैवाने या भूकंपामुळे कोणत्याही अणुऊर्जा प्रकल्पाचे नुकसान किंवा किरणोत्सर्ग झाल्याची अधिकृत माहिती अद्याप समोर आलेली नाही.

दक्षिण इराणचा हा परिसर झाग्रोस पर्वतरांगा भागाशी जोडलेला असून भूकंपीय दृष्ट्या सक्रिय मानला जातो. या भागात जमिनीखाली क्षेपणास्त्र साठवणूक व प्रक्षेपण केंद्रे असल्याची चर्चा आहे. त्यामुळे या भूकंपाकडे प्रादेशिक सुरक्षेच्या दृष्टीनेही गांभीर्याने पाहिले जात आहे.

# तणावाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र सरकार सतर्क

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** मध्यपूर्वेत निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे आखाती देशांत अडकलेल्या महाराष्ट्रातील नागरिकांच्या सुरक्षेसाठी राज्य सरकार सक्रिय झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सातत्याने संबंधित यंत्रणांशी संपर्कात असून केंद्र सरकारशीही समन्वय साधत आहेत.

मुख्यमंत्र्यांनी राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांना समन्वय कार्यात लक्ष घालण्याच्या सूचना दिल्या आहेत. दुबईतील इंडियन पीपल्स फोरमच्या सहकार्याने महाराष्ट्र सरकारने एक व्हॉट्सअ‍ॅप क्रमांक जारी केला असून मदतीची गरज असलेल्या नागरिकांनी त्यावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

दरम्यान, भारत सरकारच्या संबंधित दूतावासांनी तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सुरक्षा ॲडव्हायझरी जारी केली आहे.

पॅलेस्टाईन (रामल्ला), कतार (दोहा), सौदी अरेबिया (रियाध), इस्रायल (तेल अवीव), इराण (तेहरान), इराक (बगदाद), कुवैत, बहारीन, मस्कत, जॉर्डन आणि संयुक्त अरब अमिरात (अबू धाबी) येथे वास्तव्यास असलेल्या भारतीय नागरिकांनी सतर्क राहावे, अनावश्यक प्रवास टाळावा आणि स्थानिक प्रशासन तसेच भारतीय दूतावासांच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

आपत्कालीन परिस्थितीत संबंधित देशांतील भारतीय दूतावासांच्या २४x७ हेल्पलाइन क्रमांकांवर संपर्क साधण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. दूतावास परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवून आवश्यक त्या सूचना देत आहेत.

३७ जागांसाठी प्रक्रिया सुरू; महाराष्ट्राबाबत उत्सुकता कायम

# राज्यसभेसाठी भाजपची पहिली यादी जाहीर

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** राज्यसभेच्या ३७ जागांसाठी निवडणूक प्रक्रिया सुरू झाली असून १० राज्यांतील जागांसाठी मतदान होणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत ५ मार्चपर्यंत आहे. १६ मार्च रोजी मतदान पार पडणार आहे. दरम्यान, भारतीय जनता पार्टीने पहिल्या टप्प्यात ९ राज्यांतील उमेदवारांची घोषणा केली असून महाराष्ट्रातील उमेदवारांची नावे अद्याप जाहीर केलेली नाहीत.

भाजपने जाहीर केलेल्या यादीत बिहार, आसाम, छत्तीसगड, हरियाणा, ओडिशा आणि पश्चिम बंगाल या राज्यांचा समावेश आहे. बिहारमधून पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नवीन यांना उमेदवारी देण्यात आली असून त्यांच्यासोबत शिवेश कुमार यांचेही नाव जाहीर झाले आहे. आसाममधून तेराश गोवाला आणि जोगेन मोहन, छत्तीसगडमधून लक्ष्मी वर्मा, हरियाणामधून संजय भाटिया, ओडिशामधून मनमोहन सामल आणि सुजीत कुमार, तर पश्चिम बंगालमधून राहुल सिन्हा यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

एकूण ३७ जागांपैकी सर्वाधिक ७ जागा महाराष्ट्रातून निवडून दिल्या जाणार आहेत. तामिळनाडूतून ६, बिहार आणि पश्चिम बंगालमधून प्रत्येकी ५, ओडिशातून ४, आसाममधून ३, तेलंगणातून २, तर छत्तीसगड, हरियाणा आणि हिमाचल प्रदेशमधून प्रत्येकी एक जागेसाठी निवडणूक होणार आहे.

महाराष्ट्रातील ७ जागांबाबत राजकीय वर्तुळात मोठी उत्सुकता आहे. केंद्रीय मंत्री रामदास आठवले, तसेच धैर्यशील पाटील आणि डॉ. भागवत कराड यांच्या कार्यकाळानंतर नव्या उमेदवारांना संधी मिळणार का, याकडे लक्ष लागले आहे. भाजपकडून विनोद तावडे, रावसाहेब दानवे, विजया रहाटकर, मिलिंद कांबळे, कुणाल पाटील, भारती पवार, दिलीप कांबळे, माधव भंडारी, अमर साबळे, प्रीतम मुंडे आणि डॉ. संगीता फुसाटे आदींची नावे चर्चेत असल्याची माहिती आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी नुकताच नवी दिल्ली दौरा करून संभाव्य उमेदवारांबाबत केंद्रीय नेतृत्वाशी चर्चा केल्याचे सांगितले जाते.

विधानसभेतील सध्याच्या संख्याबळानुसार भाजप तीन जागा सहज जिंकू शकतो. चौथ्या जागेसाठी मात्र त्यांना एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनाची साथ आवश्यक ठरणार आहे. शिंदे गटाची एक जागा निश्चित मानली जात आहे. तसेच राष्ट्रवादी काँग्रेसकडून एका जागेवर उमेदवार दिला जाण्याची शक्यता आहे. महाविकास आघाडीचा एक उमेदवार विजयी होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

महाराष्ट्र विधानसभा संख्याबळानुसार राज्यसभा निवडणुकीत विजयासाठी किमान ३७ मतांची आवश्यकता आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत उमेदवार घोषणांमुळे राज्यातील राजकीय समीकरणे अधिक स्पष्ट होणार आहेत.

# पुणे मेट्रोचे एएफसी गेट्स आता 'डीफॉल्ट बंद' तिकीट स्कॅन केल्याशिवाय प्रवेश नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे :** प्रवाशांच्या सुविधेसह विनातिकीट प्रवासाला आळा घालण्यासाठी पुणे मेट्रो प्रशासनाने महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. ३ मार्च २०२६ पासून मेट्रो स्थानकांवरील ऑटोमॅटिक फेअर कलेक्शन गेट्सच्या नियमांमध्ये बदल करण्यात आला आहे. आता प्रवाशांनी स्थानकात प्रवेश करताना किंवा बाहेर पडताना तिकीट स्कॅन केल्याशिवाय गेट उघडणार नाही.

आतापर्यंत मेट्रो स्थानकांवरील एएफसी गेट्स सामान्यतः उघडे असायचे. प्रवाशाने तिकीट स्कॅन केल्यावर हिरवा दिवा लागून प्रवेश मिळत असे; तिकीट अवैध असल्यास किंवा स्कॅन न केल्यास गेट बंद होत असे. मात्र नव्या नियमानुसार गेट्स आता 'डीफॉल्ट' स्थितीत बंद राहतील. क्यूआर कोड तिकीट, मेट्रो कार्ड किंवा व्हॉट्सअ‍ॅप तिकीट स्कॅन केल्यानंतरच गेट उघडले जाईल. या बदलामुळे स्थानकांवरील प्रवेश व निर्गमन अधिक शिस्तबद्ध होईल आणि गर्दीचे व्यवस्थापन प्रभावीपणे करता येईल. विनातिकीट प्रवास करणाऱ्यांना रोखण्यासाठी हा उपाय उपयुक्त ठरेल, असा विश्वास अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. पुणे मेट्रोने आपल्या अधिकृत 'एक्स' (ट्विटर) हँडलवरून या निर्णयाची माहिती देत हा बदल ०३/०३/२०२६ पासून लागू झाल्याचे स्पष्ट केले आहे. दरम्यान, फेब्रुवारी महिन्यात पुणे मेट्रोने विक्रमी ८.२२ कोटी रुपयांचा महसूल नोंदवला. या कालावधीत एकूण ५३.२४ लाख प्रवाशांनी मेट्रोचा वापर केला. रामवाडी-वनाज कॉरिडॉरवर सर्वाधिक ४.४४ कोटी रुपयांचा महसूल मिळाला असून या मार्गावर २९.७९ लाख प्रवाशांची नोंद झाली. पिंपरी चिंचवड (पीसीएमसी) ते स्वारगेट मार्गावर २३.४४ लाख प्रवाशांनी प्रवास केला आणि ३.७७ कोटी रुपयांचा महसूल जमा झाला. वाढत्या प्रवासी संख्येच्या पार्श्वभूमीवर स्थानकांवरील शिस्त आणि सुरक्षा बळकट करण्यासाठी एएफसी गेट्समधील हा बदल महत्त्वाचा मानला जात आहे.

### राज्यसभेसाठी सेनेकडून हेमंत गोडसे?

**मुंबई :** महाराष्ट्रातील सात राज्यसभा जागांसाठी १६ मार्च २०२६ रोजी मतदान होणार असून निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय हालचालींना वेग आला आहे. शिवसेनेला एक जागा मिळण्याची शक्यता असून त्यासाठी नाशिक लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार हेमंत गोडसे यांच्या नावाची जोरदार चर्चा सुरू आहे. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत ठाकरे गटाचे राजाभाऊ वाजे यांनी गोडसे यांचा पराभव केला होता. सलग तिसऱ्यांदा खासदार होण्याची संधी त्यांना गमवावी लागली. उमेदवारी जाहीर करण्यात झालेल्या विलंबाचा त्यांना फटका बसल्याची चर्चा त्यावेळी होती.

# भारताने दिले नागरिक सुरक्षेस प्राधान्य

इराण आणि इस्रायल यांच्यातील संघर्ष दुर्दैवी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** आखाती भागातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताने आपल्या अधिकृत भूमिकेची स्पष्टता दिली आहे. इराण आणि इस्त्रायल यांच्यातील संघर्ष रमजानच्या पवित्र महिन्यात तीव्र होणे दुर्दैवी असल्याचे परराष्ट्र मंत्रालयाने सांगितले. या संघर्षात अनेकांचा मृत्यू झाल्याबद्दल भारताने तीव्र शोक व्यक्त केला आहे. मंत्रालयाने बदलत्या परिस्थितीवर सतत लक्ष ठेवत राष्ट्रीय हिताला प्राधान्य देत आवश्यक निर्णय घेत राहण्याचे आश्वासन दिले आहे.
संघर्षग्रस्त देशांमध्ये सुमारे एक कोटी भारतीय नागरिक वास्तव्यास आहेत. त्यांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य दिले जाईल, असे मंत्रालयाने सांगितले. या नागरिकांशी संबंधित भारतीय दूतावास आणि वाणिज्य दूतावास सतत संपर्कात असून आवश्यकतेनुसार ॲडव्हायजरी जारी केली जात आहेत आणि अडकलेल्या नागरिकांना मदत करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. आखाती भागातील अस्थिरतेमुळे भारताच्या ऊर्जा आयात आणि व्यापार साखळीवर परिणाम होण्याची शक्यता असून, व्यावसायिक जहाजांवरील अलीकडील हल्ल्यांमध्ये काही भारतीय नागरिकांचा मृत्यू झाला तर काही जण बेपत्ता असल्याची माहिती मिळाली आहे.

भारताने सर्व संबंधित पक्षांना संयम बाळगण्याचे आवाहन केले असून, रमजानच्या पार्श्वभूमीवर नागरिक सुरक्षेला प्राधान्य देत संघर्ष थांबवण्याची गरज असल्याचे पुन्हा सांगितले आहे. तसेच संवाद आणि कूटनीतीच्या मार्गावर भर देत परिस्थिती शांततामय मार्गाने सोडवावी, अशी भूमिका भारताने मांडली आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि परराष्ट्रमंत्री सुब्रह्मण्यम जयशंकर यांनी संबंधित देशांच्या नेत्यांशी चर्चा केली आहे. भारत या प्रमुख देशांशी संपर्कात असून बदलत्या परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवत आहे. देशहित आणि भारतीय नागरिकांच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य देत आवश्यक ती पावले उचलली जातील, असा पुनरुच्चार परराष्ट्र मंत्रालयाने केला आहे.

पिंपरी चिंचवड शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर; महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते उद्घाटन

# आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात रंगला सांस्कृतिक उत्सव

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**पिंपरी :** पिंपरी चिंचवड शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर घालण्यासाठी आयोजित आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे उद्घाटन महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते करण्यात आले. या महोत्सवाद्वारे शहराचे आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व होईल, तसेच स्थानिक कलाकारांची ओळख वाढेल, असे महापौरांनी सांगितले.

महापालिकेच्या सहकार्याने आणि पिंपरी चिंचवड फिल्म सोसायटी, गाथा फिल्म सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन व महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास मंडळ यांच्या सहकार्याने ३ ते ५ मार्च २०२६ या कालावधीत आकुर्डी प्राधिकरणातील ग. दि. माडगूळकर नाट्यगृह येथे महोत्सवाचे आयोजन करण्यात आले.

उद्घाटन समारंभात उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीचे सभापती कैलास कुटे, महापालिकेचे उपायुक्त पंकज पाटील, चित्रपट दिग्दर्शक सुजय डहाके, अभिनेता क्षितिज दाते, चित्रपट निर्माते विजय चौधरी आणि विविध चित्रपट रसिक उपस्थित होते.

महापौर रवि लांडगे यांनी सांगितले की, चित्रपट हे केवळ मनोरंजनाचे माध्यम नाही, तर व्यक्ती घडवण्याचे आणि जीवनात सकारात्मक बदल घडविण्याचे साधन आहे. त्यांनी शहरातील सांस्कृतिक चळवळीला चालना देण्यासाठी महापालिका प्रयत्नशील असल्याचे सांगितले आणि भविष्यात आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचे भव्य स्वरूपात आयोजन करण्याची योजना असल्याचे स्पष्ट केले.

उपमहापौर शर्मिला बाबर यांनी महोत्सवामुळे शहरवासीयांना विविध देशातील चित्रपट पाहण्याची संधी मिळत असल्याचे नमूद केले. विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर यांनी पिंपरी चिंचवडला सांस्कृतिक उपराजधानी म्हणून स्थान मिळत असल्याचे सांगितले.

स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांनी महोत्सवाद्वारे कला रसिक आणि कलाकार यांच्यात संवाद साधण्यावर भर दिला.

दिग्दर्शक सुजय डहाके यांनी महोत्सवामुळे कलाकार आणि रसिक यांना आंतरराष्ट्रीय अनुभव मिळत असल्याचे सांगितले. अभिनेता क्षितिज दाते यांनीही महोत्सवाचे महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमाचे स्वागत डॉ. विश्वास शेंबेकर यांनी केले, प्रास्ताविक पंकज पाटील यांनी दिले, सूत्रसंचालन चैतन्य कुलकर्णी यांनी केले आणि आभार महापालिकेचे विशेष अधिकारी किरण गायकवाड यांनी मानले. शिवांजली डान्स अकॅडमीच्या कलाकारांनी कथक नृत्याद्वारे कार्यक्रमाची सुरुवात केली.

# दोन दिवसांत गुंतवणूकदारांचे ११ लाख कोटींचे नुकसान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष तीव्र झाल्यानंतर भारतीय शेअर बाजारात मोठी घसरण नोंदवली गेली आहे. गेल्या दोन दिवसांत बाजारमूल्यात सुमारे ११ लाख कोटी रुपयांची घट झाली असून गुंतवणूकदारांचे मोठे नुकसान झाले आहे. वाढत्या आर्थिक आणि भूराजनैतिक तणावामुळे गुंतवणूकदार सुरक्षित पर्यायांकडे वळत असल्याचे चित्र आहे.

सोमवारी प्रमुख निर्देशांकांमध्ये सुमारे २.५ टक्क्यांची घसरण झाली. सेन्सेक्स १०४८ अंकांनी घसरून ८१ हजारांच्या खाली आला, तर निफ्टी ३०० अंकांनी घसरत २५ हजारांच्या खाली बंद झाला. या घसरणीमुळे किरकोळ गुंतवणूकदारांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले असून एसआयपी सुरू ठेवावी की थांबवावी, असा प्रश्न अनेकांसमोर उभा राहिला आहे.

तज्ज्ञांच्या मते, अनिश्चिततेच्या काळात सोने आणि इतर सुरक्षित गुंतवणूक पर्यायांकडे भांडवल वळण्याची शक्यता असते. त्यामुळे गोल्ड फ्युचर्समध्ये तेजी दिसू शकते. याशिवाय कच्च्या तेलाच्या दरात वाढ झाल्यास त्याचा दबाव भारतीय बाजारावर कायम राहू शकतो. अँथ्रोपिकच्या क्लाउड एआय मॉडेलसंदर्भातील घडामोडींमुळे आयटी समभागांमध्ये चढउतार वाढल्याचे निरीक्षण आहे. देशांतर्गत आर्थिक निर्देशक तुलनेने सकारात्मक आहेत. जीडीपी आणि जीएसटी संकलनाची अलीकडील आकडेवारी अर्थव्यवस्थेची स्थिरता दर्शवते.

## संपादकीय

# नेता गेला, व्यवस्था शाबूत?



**इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या हत्येने पश्चिम आशियात धक्क्याची लाट उसळली आहे. पण प्रश्न व्यक्तीपुरता मर्यादित नाही. राजवट बदलाच्या घोषणांमध्ये आणि वास्तवातील सत्ताकारणात मोठी दरी असते आणि इतिहास सांगतो की ती दरी नेहमीच रक्ताने भरली जाते.**

इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांची हत्या ही निव्वळ एका व्यक्तीचा अंत नाही; तर ती एका संरचनेला दिलेले आव्हान आहे. परंतु कोणतीही सत्ताव्यवस्था व्यक्तीवर उभी असली तरी ती व्यक्तीपुरती मर्यादित नसते. विशेषतः १९७९ च्या इस्लामिक क्रांतीनंतर उभ्या राहिलेल्या इराणी व्यवस्थेत तर सत्तेची मुळे व्यक्तीपेक्षा संस्थांमध्ये अधिक खोलवर रुजलेली आहेत. अमेरिकेचे युद्ध सचिव पीट हेगसेथ यांनी “हे राजवट बदलण्याचे युद्ध नाही, परंतु राजवट नक्कीच बदलली आहे” असे म्हटले. या विधानातील विरोधाभासच सध्याच्या धोरणाचा गाभा उघड करतो. उद्दिष्ट जर राजवट बदल नसल्याचा दावा असेल, तर त्यानंतर राजवट बदलल्याचे समाधान कशाचे? आणि खरे उद्दिष्ट बदलच असेल, तर त्यासाठीची राजकीय व सामाजिक तयारी कोठे आहे? अमेरिका आणि इस्रायलची रणनीती अशी दिसते की तीव्र हवाई हल्ल्यांच्या दबावाखाली इराणी समाजात अंतर्गत उठाव घडवून आणला जाईल. ही कल्पना नवीन नाही. इराकमध्ये सद्दाम हुसेनचा पाडाव, लिबियात गद्दाफीचा अंत आणि अफगाणिस्तानातील तालिबानविरोधी मोहीम या सर्व उदाहरणांत बाह्य लष्करी हस्तक्षेपानंतर ‘नव्या व्यवस्थे’ची अपेक्षा ठेवली गेली. पण प्रत्यक्षात जे घडले ते म्हणजे दीर्घकालीन अस्थिरता, सत्तेची पोकळी आणि अराजकतेची साखळी. इराणचे वैशिष्ट्य असे की ते केवळ एका हुकूमशहावर अवलंबून असलेले राज्य नाही. तेथे इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स आयआरजीसी ही संस्था सत्तेचा कणा आहे. तिचे कार्य फक्त लष्करी नाही; आर्थिक, वैचारिक आणि राजकीय प्रभाव तिच्या जाळ्यात गुंफलेला आहे. १९७९ च्या क्रांतीचे संरक्षण हेच तिचे घोषित ध्येय. अशा परिस्थितीत एका नेत्याचा अंत म्हणजे व्यवस्थेचा अंत ठरेल, ही अपेक्षा धोकादायक साधीकरण ठरू शकते. डोनाल्ड ट्रम्प यांची शैली एकतर्फी निर्णयांची राहिली आहे. जागतिक शुल्कयुद्धे, ग्रीनलँडविषयीची विधाने, युक्रेन प्रश्नात रशियाशी केलेले व्यवहार या सर्वांत सल्लामसलतीपेक्षा धक्का देण्याची वृत्ती दिसते. इराणच्या बाबतीतही तेच चित्र आहे. देशांतर्गत विरोधी शक्तींशी समन्वय किंवा पर्यायी राजकीय संरचनेची आखणी यांचे कोणतेही संकेत दिसत नाहीत. केवळ बाह्य आघातातून अंतर्गत क्रांती घडेल, अशी अपेक्षा आहे. परंतु इतिहास याउलट सांगतो. इराकमध्ये राजवट कोसळली, पण स्थैर्य आले नाही. अफगाणिस्तानात दोन दशके घालवल्यानंतर अमेरिका माघारी फिरली आणि तालिबान पुन्हा सत्तेत आले. लिबियात गद्दाफीचा अंत झाला; पण त्यानंतर निर्माण झालेल्या सत्ताविरहिततेने देशाचे तुकडे केले. राजवट बदलणे आणि राष्ट्र पुनर्रचना करणे या दोन पूर्णपणे भिन्न प्रक्रिया आहेत, आणि दुसऱ्यासाठी पहिल्यापेक्षा अधिक संयम, संसाधने आणि स्थानिक वैधता आवश्यक असते. इराण हे प्रादेशिक प्रॉक्सी नेटवर्क असलेले, लष्करीदृष्ट्या सक्षम आणि राष्ट्रवादी भावनेने बांधलेले राज्य आहे. बाह्य आक्रमण अनेकदा अंतर्गत मतभेदांना तात्पुरते थोपवते. त्यामुळे अपेक्षित उठावाऐवजी राष्ट्राभोवती एकत्रीकरण घडू शकते. याचाच अर्थ ही रणनीती उलटीही पडू शकते. ट्रम्प स्वतःला शांततेचे अध्यक्ष म्हणवतात; पण त्यांच्या कारकिर्दीत विविध देशांवर बॉम्बहल्ले झाले आहेत. युद्धे संपवण्याच्या घोषणांबरोबर नवीन आघाड्या उघडण्याची विसंगती त्यांच्या धोरणात सातत्याने दिसते. विशेष म्हणजे, त्यांनी एकेकाळी जॉर्ज डब्ल्यू बुश यांच्या इराक युद्धावर कठोर टीका केली होती. आज त्याच धर्तीवर उभ्या असलेल्या मोहिमेचे नेतृत्व ते करत आहेत आणि यावेळी अमेरिकेतही त्यास व्यापक राजकीय पाठिंबा नाही. या संघर्षाचे व्यापक परिणाम पश्चिम आशियापुरते मर्यादित राहणार नाहीत. दुबई, अबू धाबी, दोहा यांसारखी नव्या अर्थव्यवस्थेची प्रतीके असलेली शहरे प्रादेशिक स्थैर्यावर अवलंबून आहेत. युद्धाचा विस्तार ऊर्जा बाजाराला, गुंतवणुकीला आणि जागतिक पुरवठा साखळ्यांना धक्का देऊ शकतो. अशा वेळी ‘योजनेचा अभाव’ ही केवळ धोरणात्मक चूक नसून आर्थिक जोखीम ठरते. मुळात प्रश्न असा आहे की अमेरिका आणि इस्रायलने परवाच्या राजकीय आराखड्याशिवाय युद्धाचा दरवाजा उघडला आहे का? जर उत्तर होकारार्थी असेल, तर त्याचे परिणाम अनिश्चित आणि दीर्घकालीन असतील. जर उत्तर नकारार्थी असेल, तर त्या आराखड्याची स्पष्टता जगासमोर यायला हवी. खामेनी गेले असतील; पण व्यवस्था तशीच राहिली तर काय? किंवा व्यवस्था कोसळली तर त्याऐवजी काय? या दोन प्रश्नांची उत्तरे मिळेपर्यंत हा संघर्ष केवळ लष्करी नाही; तो भू-राजकीय जुगार ठरतो. इतिहास सांगतो की, राजवट बदलाच्या युद्धांत विजेते कमी आणि विध्वंस जास्त असतो. पश्चिम आशियाने हा धडा अनेकदा दिला आहे. प्रश्न इतकाच, तो यावेळी कोण शिकणार?

# इराण: धर्म, राज्य आणि नियंत्रणाची गुंतागुंत

१९७९ च्या इराणी इस्लामिक क्रांतीनंतर उभ्या राहिलेल्या इराणच्या राजकीय व्यवस्थेकडे केवळ ‘धर्माधिष्ठित शासन’ म्हणून पाहणे अपुरे ठरेल. ती एक बहुपदरी, संस्थात्मक आणि काटेकोरपणे आखलेली सत्ताक्रम रचना आहे ज्यात लोकशाहीची चौकट आहे; पण तिच्यावर धर्माधिष्ठित नियंत्रणाचे छत्र अधिक प्रभावी आहे.

या व्यवस्थेचा केंद्रबिंदू म्हणजे ‘वेलायत-ए-फाकीह’ म्हणजेच इस्लामी न्यायविदांच्या सर्वोच्च संरक्षणाचे तत्त्व. या संकल्पनेला संस्थात्मक रूप देणारे होते रुहोल्ला खोमेनी. शाहविरोधी चळवळीच्या उन्मादातून जन्मलेल्या नव्या संविधानात त्यांनी धार्मिक नेतृत्वाला अंतिम राजकीय वैधता दिली. यानंतर इराणमध्ये ‘सर्वोच्च नेता’ ही पदवी केवळ प्रतीकात्मक न राहता निर्णायक ठरली.

आज त्या पदावर आहेत अली खामेनेई. परंतु प्रश्न व्यक्तीचा नाही; प्रश्न संरचनेचा आहे. इराणमध्ये राष्ट्राध्यक्ष, संसद (मजलिस), न्यायपालिका या संस्था अस्तित्वात आहेत. निवडणुका होतात. राजकीय गटही आहेत. पण या सर्वांवर अंतिम नियंत्रण सर्वोच्च नेत्याचे असते. संरक्षण, परराष्ट्र धोरण, गुप्तचर यंत्रणा आणि लष्कर या सर्व क्षेत्रांमध्ये त्यांची निर्णायक भूमिका असते.

या पिरॅमिडच्या दुसऱ्या स्तरावर दोन महत्त्वाच्या संस्था येतात. पहिली म्हणजे गार्डियन कौन्सिल. ही परिषद संसदेत मंजूर झालेल्या कायद्यांचे इस्लामी आणि घटनात्मक परीक्षण करते. निवडणुकांसाठी उमेदवारांची पात्रता ठरवण्याचा अधिकारही तिच्याकडे असतो. त्यामुळे लोकशाही प्रक्रिया अस्तित्वात असली तरी तिची पूर्वपडताळणी धार्मिक चौकटीतून होते. दुसरी संस्था म्हणजे असेंब्ली ऑफ एक्स्पर्ट्स. सैद्धांतिकदृष्ट्या ही परिषद सर्वोच्च नेत्याची निवड करते आणि आवश्यक असल्यास त्यांना पदच्युत करण्याचा अधिकार राखते. परंतु प्रत्यक्षात या संस्थेची कार्यपद्धतीही धार्मिक प्रतिष्ठानांच्या प्रभावाखालीच राहिली आहे. त्यामुळे सत्ता-संतुलनाचा

**» १९७९ च्या इस्लामिक क्रांतीनंतर उभ्या राहिलेल्या इराणच्या सत्तारचनेत लोकशाही आणि धर्मसत्ता यांचे विलक्षण मिश्रण दिसते. सर्वोच्च नेता केंद्रस्थानी असलेल्या या पिरॅमिडमध्ये निवडणुका आहेत, संस्था आहेत; पण अंतिम वैधता ही धार्मिक नियंत्रणातूनच येते.**



यंत्रणात्मक आधार असला तरी तो सक्रिय राजकीय प्रतिकारात क्वचितच उतरतो.

इराणच्या सत्ताक्रमात तिसरा आणि अत्यंत प्रभावी घटक म्हणजे इस्लामिक रिव्होल्यूशनरी गार्ड कॉर्प्स (आयआरजीसी). ही केवळ लष्करी संस्था नाही; ती आर्थिक, औद्योगिक आणि परराष्ट्र धोरणातही प्रभाव टाकते. प्रादेशिक राजकारणात ‘प्रॉक्सी नेटवर्क’ उभारण्यापासून देशांतर्गत सुरक्षा नियंत्रणापर्यंत तिची भूमिका निर्णायक आहे. त्यामुळे सर्वोच्च नेत्याच्या अधिकाराला कार्यकारी बळ देणारी हीच यंत्रणा ठरते.

ही रचना का निर्माण झाली, याचा विचार केल्यास त्यामागे दोन घटक दिसतात. एक म्हणजे शाहकालीन केंद्रीकृत, पाश्चिमात्याभिमुख सत्तेविरोधातील प्रतिक्रिया. दुसरा म्हणजे शिया धार्मिक परंपरेतील ‘धर्मगुरूंच्या संरक्षणात्मक नेतृत्वाचा’ इतिहास. या दोन प्रवाहांचे मिश्रण म्हणजे सध्याची पिरॅमिड रचना. ती केवळ धार्मिक भावनेवर आधारित नाही; तर सत्तेची संस्थात्मक स्थैर्य टिकवण्यासाठी आखलेली आहे. मात्र, या मॉडेलचे बलस्थानच त्याची मर्यादा ठरते. केंद्रीकृत नियंत्रणामुळे धोरणात्मक सातत्य राखता येते; पण विरोधी आवाजांना मर्यादा येतात. अलीकडील वर्षांत महागाई, निर्बंध आणि सामाजिक असंतोषाच्या पार्श्वभूमीवर रस्त्यावर उतरलेले आंदोलन हे या व्यवस्थेतील तणावाचे लक्षण होते. निवडणुका होतात; पण पर्यायांची चौकट मर्यादित असते, अशी टीका सातत्याने होते. इराणची व्यवस्था पूर्ण धर्मशाही नाही; कारण निवडून आलेली सरकारे अस्तित्वात आहेत. ती पूर्ण लोकशाहीही नाही; कारण अंतिम वैधता धार्मिक नेतृत्वाकडे आहे. त्यामुळे ती ‘हायब्रिड सिस्टीम’ म्हणून ओळखली जाते जिथे राज्य आणि धर्म यांची सीमा जाणीवपूर्वक धूसर ठेवली गेली आहे.

या रचनेचा सर्वात मोठा कस लागतो तो सत्ता संक्रमणाच्या वेळी. सर्वोच्च नेता हा केंद्रबिंदू असल्याने त्यांच्या अनुपस्थितीत पिरॅमिडची संतुलनरेषा हलते. त्यामुळे ‘संस्थात्मक सातत्य’ आणि ‘व्यक्तिनिष्ठ केंद्रीकरण’ यातील द्वंद्व प्रकर्षाने समोर येते. भविष्यातील राजकीय स्थैर्य हे या संक्रमण प्रक्रियेवर अवलंबून असेल.

जागतिक स्तरावर इराणची ही रचना अनेकांना अप्रिय वाटू शकते; परंतु ती त्यांच्या ऐतिहासिक अनुभवातून जन्मलेली आहे. पश्चिमी लोकशाहीचा आराखडा सर्व समाजांवर लागू होईलच, असे नाही. परंतु कोणतीही व्यवस्था दीर्घकाळ टिकण्यासाठी तिला वैधतेची पुनर्पुष्टी करावी लागते. आर्थिक अडचणी, बाह्य दबाव आणि अंतर्गत असंतोष यांच्या संगमावर हीच खरी परीक्षा असते.

इराणचा सत्तापिरॅमिड म्हणूनच अभ्यासाचा विषय आहे. तो केवळ धार्मिक राज्यव्यवस्थेचा नमुना नाही; तर सत्ता, वैधता आणि नियंत्रण यांचा गुंतागुंतीचा प्रयोग आहे. प्रश्न इतकाच आहे की, ही रचना बदलत्या काळाशी जुळवून घेईल का, की तिचे केंद्रीकरणच तिच्या पुढील अस्थैर्याचे कारण ठरेल?

# पारदर्शक आणि गतीमान कारभारावर देणार भर

## अभिषेक बारणे यांनी पदभार स्वीकारला

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** महानगरपालिकेच्या अत्यंत महत्त्वाच्या स्थायी समितीच्या सभापतीपदी निवड झाल्यानंतर अभिषेक बारणे यांनी आज अधिकृतपणे पदभार स्वीकारला.

महापालिका भवनातील स्थायी समिती सभापतींच्या दालनात हा पदभार स्वीकारण्याचा सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी चिंचवड विधानसभेचे आमदार शंकरभाऊ जगताप यांनी नवनिर्वाचित सभापतींचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले आणि पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या.



पदभार स्वीकारल्यानंतर अभिषेक बारणे यांनी शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे स्पष्ट केले. पिंपरी-चिंचवड शहराचा झपाट्याने विस्तार होत असून नागरिकांच्या अपेक्षा वाढत आहेत. अशा परिस्थितीत स्थायी समितीवर मोठी जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. शहराचा विकास आराखडा डोळ्यासमोर ठेवून रखडलेले प्रकल्प मार्गी लावण्याला प्राधान्य दिले जाईल, असे त्यांनी सांगितले.

आमदार शंकरभाऊ जगताप, आमदार महेशदादा लांडगे, आमदार उमाताई खापरे आणि आमदार अमित गोरखे यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील विविध प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी प्रशासनाशी समन्वय साधून काम केले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

तरुण आणि अभ्यासू नेतृत्व म्हणून ओळख असलेल्या अभिषेक बारणे यांच्या कार्यकाळात मूलभूत सुविधांना प्राधान्य दिले जाईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी तातडीने प्रशासकीय कामकाजाचा आढावा घेण्यास सुरुवात केली असून, शहरातील सुरू असलेली आणि प्रलंबित विकासकामे मार्गी लावण्यासाठी ते सज्ज झाले आहेत.

# वसंतदादा पाटील यांना अभिवादन



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पालिकेच्या वतीने महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पद्मभूषण वसंतदादा पाटील यांच्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. दापोडी येथील त्यांच्या अर्धाकृती पुतळ्यास नगरसदस्या तृप्ती कांबळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपस्थितांनी वसंतदादा पाटील यांच्या कार्याचा गौरवपूर्ण स्मरण केला. महापालिकेचे जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, दिवंगत मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांचे शालेय मित्र रविंद्र भोसले तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर आदी या वेळी उपस्थित होते. उपस्थितांनी वसंतदादा पाटील यांच्या विचारांचा आदर्श घेऊन सामाजिक समता, लोककल्याण आणि विकासाभिमुख प्रशासनासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प व्यक्त केला. सहकार क्षेत्रातील उल्लेखनीय आणि अद्वितीय कार्यामुळेच त्यांना ‘पद्मभूषण’ या देशातील प्रतिष्ठित नागरी सन्मानाने गौरविण्यात आले होते, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# वीजेसाठी ३५० कोटींची तरतूद

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड शहरातील वाढत्या वीज मागणीच्या पार्श्वभूमीवर राज्य शासनाने पुनर्गठित वितरण क्षेत्र योजना आणि इतर योजनांद्वारे निधीची तरतूद केल्याची माहिती ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिली. पुणे जिल्ह्यासाठी एकूण ११०० कोटी रुपयांचा प्रस्ताव असून त्यापैकी पुणे आणि पिंपरी-चिंचवडसाठी सुमारे ३५० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पिंपरी-चिंचवडमधील औद्योगिक, व्यावसायिक आस्थापना तसेच नागरिकांकडून वारंवार वीजपुरवठ्याबाबत तक्रारी येत आहेत. आरडीएसएस अंतर्गत १९२ कोटी आणि नागपूर-पुणे स्पेशल असिस्टंट स्कीम (एनपीएसएएस) अंतर्गत १५६ कोटी रुपयांचे प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असल्याकडे आमदार शंकर जगताप यांनी लक्ष वेधले. ताथवडे येथील उपकेंद्राचा प्रस्ताव दीड वर्षांपासून महापारेषणकडे प्रलंबित असल्याबाबत चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असे आश्वासन राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी दिले.

आयटी पार्कमुळे रावेत, किवळे, मामुर्डी, वाकड, ताथवडे आणि पिंपळे सौदागर भागात ‘वर्क फ्रॉम होम’ करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. मात्र, वाढत्या लोडमुळे वीजपुरवठ्यात सातत्य आणि गुणवत्तेच्या समस्या निर्माण होत असल्याची तक्रार करण्यात आली.

# विषय समितींच्या सभापतींची निवडणूक संपन्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विषय समितींच्या सभापतीपदाची निवडणूक आज पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात पार पडली. संबंधित समित्यांच्या विशेष सभांमध्ये मतदानाची प्रक्रिया पूर्ण होत नव्या सभापतींची अधिकृत घोषणा करण्यात आली.

निवडणुकीत विधी समितीच्या सभापतीपदी सुजाता बोराटे, महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदी राणी पठारे, शहर सुधारणा समितीच्या सभापतीपदी संजय नाना काटे, क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीच्या सभापतीपदी कैलास कुटे आणि शिक्षण समितीच्या सभापतीपदी



रविना आंगोळकर यांची निवड झाली.

महापालिकेच्या विविध विषय समित्यांच्या सभापतींची निवड करण्यासाठी संबंधित समित्यांच्या विशेष सभा आयोजित करण्यात आल्या होत्या. या सभांचे पिठासीन अधिकारी म्हणून विभागीय आयुक्तांचे प्रतिनिधी तथा पुणे महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी कामकाज पाहिले. निवड जाहीर झाल्यानंतर त्यांनी नवनिर्वाचित सभापतींना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. यावेळी विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, विक्रांत बगाडे, नगरसचिव मुकेश कोळप, विशेष अधिकारी किरण गायकवाड यांच्यासह नगरसेवक आणि नगरसेविका उपस्थित होते. जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

विधी समितीच्या विशेष सभेला ज्ञानेश्वर जगताप, कुंदा भिसे, कुशाग्र कदम, शेखर चिंचवडे आणि वर्षा जगताप उपस्थित होते. महिला व बालकल्याण समितीच्या सभेला पल्लवी जगताप, निता पाडाळे, रेश्मा भुजबळ, शिवानी नरळे, सुप्रिया चांदगुडे, निकिता कदम आणि सारिका मासूळकर उपस्थित होत्या. शहर सुधारणा समितीच्या सभेला अर्चना सस्ते, कुणाल वाव्हळकर, उत्तमराव केंदळे आणि अनंत कोऱ्हाळे उपस्थित होते. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीच्या सभेला शाम जगताप, तानाजी बारणे, धर्मपाल तंतरपाळे, योगेश लांडगे आणि जितेंद्र ननवरे उपस्थित होते. शिक्षण समितीच्या सभेला पल्लवी वाल्हेकर, कविता भोंगाळे, रिटा सानप, सारिका बोऱ्हाडे, प्रियांका कुदळे आणि योगिता बारणे उपस्थित होत्या.

## महापौर रवि लांडगे यांचे होळीनिमित्त आवाहन

# वर्षातील प्रत्येक सण हा पर्यावरणपूरक साजरा करा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पिंपळे गुरव येथील शाळा क्रमांक ५४ मध्ये महापौर रवि लांडगे यांच्या संकल्पनेतून पर्यावरणपूरक होळी उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणपूरक सण साजरे करण्याबाबत जनजागृती व्हावी आणि सणांच्या माध्यमातून मूल्यशिक्षण रुजावे, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.



महापौर रवि लांडगे यांनी विद्यार्थ्यांना होळी सणाचे सांस्कृतिक, सामाजिक आणि पौराणिक महत्त्व समजावून सांगितले. होळीनंतर बदलणारे ऋतुचक्र, निसर्गाशी असलेले मानवी नाते तसेच भारतीय संस्कृतीतील सणांचे स्थान याविषयी त्यांनी मार्गदर्शन केले. “होळी हा केवळ रंगांचा सण नसून वाईट प्रवृत्तींचा त्याग करून चांगल्या विचारांचा स्वीकार करण्याचा सण आहे,” असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना सकारात्मक विचारांची कास धरण्याचे आवाहन केले. वर्षातील प्रत्येक सण पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली.

या कार्यक्रमाला शिक्षण विभागाच्या सभापती रविना आंगोळकर, नगरसदस्य ज्ञानेश्वर जगताप, शशिकांत कदम, पर्यवेक्षक ज्योती तापकीर, श्रीकांत चौगुले, मुख्याध्यापिका गीतांजली पोळ, पांडुरंग मुद्गुन तसेच शिक्षक, पालक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान प्रतीकात्मक स्वरूपात ‘फसवणूक, खोटं बोलणे, मोह, भांडणे, स्वार्थ, चोरी, अहंकार, चिडचिड आणि भ्रष्टाचार’ या नकारात्मक प्रवृत्तींची होळी पेटवण्यात आली. समाजात प्रामाणिकपणा, बंधुभाव, पर्यावरणप्रेम आणि सामाजिक जबाबदारी यांसारखी मूल्ये रुजवण्याचा संदेश देण्यात आला.

पिंपळे गुरव येथील शाळा क्रमांक ५४ ही महानगरपालिकेची सर्वाधिक पटसंख्या असलेली शाळा असल्याचा उल्लेख करत महापौरांनी मुख्याध्यापक आणि शिक्षकांचे विशेष कौतुक केले. “महापालिका शाळा केवळ शिक्षण देत नाहीत, तर विद्यार्थ्यांमध्ये संस्कारही घडवतात,” असे ते म्हणाले.

विद्यार्थ्यांनी ‘होळी लहान करा, पोळी दान करा’, ‘पर्यावरण रक्षक हेच मूल्यशिक्षण’ आणि ‘नैसर्गिक रंग वापरा, पाणी वाचवा’ अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला. महापौरांनी नैसर्गिक रंगांचा वापर करून विद्यार्थ्यांसमवेत होळी साजरी केली आणि पर्यावरणपूरक सण साजरा करण्याचा संदेश दिला.

इयत्ता तिसरीच्या विद्यार्थिनींनी ‘छत्रपती शिवाजी महाराज’, ‘माझा बाबा’ आणि ‘माझी मराठी’ या कविता सादर केल्या. तसेच राधिका अग्रे हिने सर्व विद्यार्थ्यांच्या वतीने प्रतिज्ञा घेतली की, “दरवर्षी होळी नैसर्गिक रंगांच्या माध्यमातूनच साजरी करू.” महापौरांच्या उपस्थितीत सर्व विद्यार्थी आणि पालकांनी ही प्रतिज्ञा पुन्हा उच्चारून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# लिनियर गार्डनमध्ये बेदरकार खोदकामाचा गंभीर आरोप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपळे सौदागर येथील पी. के. चौक ते कोकणे चौक दरम्यानच्या रस्त्यालगत विकसित करण्यात आलेल्या लिनियर गार्डनमध्ये “झाडे लावा, झाडे जगवा” मोहिमेंतर्गत नुकतेच वृक्षारोपण आणि सुशोभीकरण करण्यात आले होते. मात्र, काही दिवसांतच या उपक्रमावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. पालिकेकडून उद्यानाच्या दोन्ही टोकांना कंपोस्ट खतनिर्मितीसाठी खड्डे तसेच कर्मचाऱ्यांसाठी पत्र्याचे शेड उभारण्याचे काम हाती घेण्यात आले. हे काम करताना जेसीबीद्वारे बेदरकार खोदकाम करण्यात आल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे.

या खोदकामामुळे नव्याने लावलेली तसेच आधीपासून वाढलेली अनेक झाडे नुकसानग्रस्त झाली. काही झाडांची मुळे उघडी पडली असून काही झाडे मोडून पडल्याचे स्थानिकांनी सांगितले. “जर झाडे मोडायचीच होती, तर ती लावली कशाला?” असा सवाल उपस्थित केला जात आहे.

दररोज लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि परिसरातील रहिवासी विरंगुळ्यासाठी या उद्यानात येतात. मात्र, काम सुरू असल्याबाबत कोणतेही सूचना फलक न लावता थेट यंत्रसामग्रीचा वापर करण्यात आला. जेसीबीच्या अवतीभोवती मुले खेळताना दिसत असल्याने संभाव्य दुर्घटनेची भीती व्यक्त होत आहे. दुर्घटना घडल्यास जबाबदारी कोणाची, असा गंभीर प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अ‍ॅण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### एटीएम मशीनसह ७.८३ लाखांची चोरी

**यवत** : पुणे–सोलापूर राष्ट्रीय महामार्गालगत यवत पोलीस स्टेशन हद्दीतील वरवंड येथे एटीएम मशीनसह सुमारे ७ लाख ८३ हजार ३०० रुपयांची चोरी झाल्याची घटना उघडकीस आली आहे. वरवंड येथील बसस्टँडजवळ अब्दुल पटेल यांच्या जागेत सुमारे ७० हजार रुपये किमतीचे एटीएम मशीन बसविण्यात आले होते. या मशीनमध्ये सुमारे ७ लाख १३ हजार ३०० रुपये रोख रक्कम होती. अज्ञात व्यक्तींनी संपूर्ण एटीएम मशीन ओढून नेल्याची धक्कादायक घटना घडली.

### रांजणगाव परिसरात भूकंपाचे धक्के

**पुणे** : सोमवारी (दि. २) दुपारी सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास रांजणगाव परिसरात भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. अचानक झालेल्या कंपनामुळे नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले असून अनेक ठिकाणी नागरिक घराबाहेर पडल्याचे दिसून आले. धक्क्यांमुळे काही घरांच्या भिंतींना तडे गेल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. सुदैवाने कोणतीही जीवितहानी झालेली नाही; मात्र नुकसानीचे पंचनामे करण्यात यावेत, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.

### शस्त्रांचा धाक दाखवत चंदनचोरी

**पुणे** : थेऊर येथील पुनावाला स्टड फार्म येथे कर्मचाऱ्यांना धारदार शस्त्राचा धाक दाखवत चंदनाची झाडे चोरून नेल्याची घटना नुकतीच घडली. या प्रकारामुळे परिसरात खळबळ उडाली असून सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. याप्रकरणी परमेश्वर हिरामन कोळी यांनी लोणी काळभोर पोलिसांत तक्रार दाखल केली आहे. त्यांच्या तक्रारीनुसार, पहाटेच्या सुमारास चार अज्ञात इसम फार्म परिसरात घुसले. त्यांनी तेथील कर्मचाऱ्यांना धारदार शस्त्राचा धाक दाखवत भीतीचे वातावरण निर्माण केले आणि चंदनाची झाडे कापून घेऊन पोबारा केला.

फाल्गुन पौर्णिमेनिमित्त पारंपारिक श्रीखंड पूजा उत्साहात संपन्न

# धामणीतील श्री खंडोबाला फुलांची आरास

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**लोणी-धामणी** : आंबेगाव तालुक्यातील धामणी येथील पुरातन श्री कुलस्वामी म्हाळसाकांत खंडोबा देवस्थान मंदिरात फाल्गुन पौर्णिमा (धुलीवंदन) निमित्त स्वयंभू सप्तशिवलिंगाची पारंपारिक श्रीखंड पूजा भक्तिभावात पार पडली. यावेळी गाभाऱ्यात झेंडू व विविध रंगीबेरंगी फुलांनी आकर्षक सजावट करण्यात आली होती.

पहाटे भंडाऱ्याचा येळकोट जयघोष करत नऊ जोडप्यांच्या हस्ते स्वयंभू सप्तशिवलिंगाला दुग्धाभिषेक व रुद्राभिषेक करण्यात आला. त्यानंतर सेवेकऱ्यांनी सुवासिक अत्तर व केशरमिश्रित भंडाऱ्याचा लेप करून सप्तरंगांची उधळण केली. वस्त्रालंकाराने सजवलेल्या खंडोबा, म्हाळसाई व बाणाई यांच्या लोभस मूर्तींचे दर्शन घेताना भाविक सुखावले.

देवस्थानाचे सेवेकरी दादाभाऊ भगत, प्रभाकर भगत, सुभाष तांबे, नामदेव भगत आदींनी पारंपारिक पूजा बांधून श्रीखंडाचा नैवेद्य अर्पण केला. त्यानंतर आरती करून मंदिर दर्शनासाठी खुले करण्यात आले. रुद्राभिषेकाचे पौरोहित्य प्रमोद देखणे यांनी केले.

पंचक्रोशीतील भाविकांनी दर्शन व तळीभंडाऱ्यासाठी गर्दी केली होती. गाभाऱ्याची फुलांची सजावट सौ. पूजा जाधव व सचिन-सौरभ जाधव यांच्या सौजन्याने करण्यात आली. अभिषेकासाठी बसलेल्या यजमान मानकऱ्यांचा देवस्थानाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

फाल्गुन पौर्णिमा ही होळी व धुलीवंदनाशी संबंधित असून वाईटावर चांगल्याचा विजय दर्शवणारी मानली जाते. "मल्हारी महात्म्य"नुसार मणी-मल्ल दैत्यांचा वध केल्यानंतर भक्तांनी खंडोबाला दहीभात व श्रीखंडाचा नैवेद्य अर्पण केल्याची परंपरा आजही चंपाषष्ठी व फाल्गुन पौर्णिमेला पाळली जाते.

# डिंभा उजव्या कालव्याला पाणी ६० गावांतील शेतीला दिलासा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी** : जलसंपदा विभागाच्या कुकडी प्रकल्पांतर्गत आंबेगाव तालुक्यातील डिंभे धरणातून उजव्या कालव्याला पाणी सोडण्यात आले असून त्यामुळे शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण आहे.

डिंभे धरण (हुतात्मा बाबू गेणू जलाशय) येथून सोडण्यात आलेले पाणी आंबेगाव आणि शिरूर तालुक्यातील सुमारे ६० गावांतील शेती पिकांसाठी लाभदायक ठरणार आहे. मात्र, कालव्याचे पाणी जपून व नियोजनबद्ध वापरावे, असे आवाहन जलसंपदा विभागाने केले आहे.

पूर्व आंबेगाव भागात उन्हाची तीव्रता वाढल्याने शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला होता. अनेक शेतकऱ्यांनी ऊसासह उन्हाळी नगदी पिके घेतली असून पाण्याची गरज मोठ्या प्रमाणात भासत होती. वाढत्या तापमानामुळे काही ठिकाणी पिकांनी माना टाकण्यास सुरुवात केली होती. अशा परिस्थितीत उजव्या कालव्याला पाणी सोडल्याने मोठा दिलासा मिळाला आहे.

कालव्याला पाणी सोडण्याबाबत शेतकऱ्यांनी माजी सहकार मंत्री दिलीप वळसे पाटील यांना निवेदन दिले होते. नियमित पाणीपुरवठ्यामुळे शेतीच्या उत्पादनात स्थैर्य येऊन शेतकऱ्यांच्या आर्थिक प्रगतीत या प्रकल्पाचा मोलाचा वाटा राहणार असल्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

याशिवाय अनेक गावांच्या सार्वजनिक पाणीपुरवठा योजना या कालव्यावर अवलंबून असल्याने पिण्याच्या पाण्याचाही प्रश्न काही प्रमाणात सुटणार आहे.

माजी अध्यक्ष अनिल वाळुंज यांनी सांगितले की, पाणीटंचाईच्या काळात कालव्याला पाणी मिळाल्याने शेती पिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

# भिगवणमध्ये नव्या ज्वारीला ६,१०१ रुपयांचा उच्चांकी दर

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**भिगवण** : इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या उपबाजार भिगवण येथे नव्या ज्वारीला प्रति क्विंटल ६,१०१ रुपयांचा उच्चांकी दर मिळाल्याने शेतकरी वर्गात समाधानाचे वातावरण आहे. रविवारी (दि. १ मार्च २०२६) भुसार मार्केटमध्ये ज्वारी, गहू व हरभरा या शेतमालाची आवक सुरू झाली असून ज्वारीच्या दरवाढीमुळे बाजारात सकारात्मक हालचाल दिसून आली.

दीपक मचाले यांच्या आडतीवर आलेल्या ज्वारीची खरेदी महावीर वडुजकर यांनी ६,१०१ रुपयांच्या दराने केली. सध्याच्या चढ-उताराच्या बाजारस्थितीत ज्वारीला मिळालेला हा दर शेतकऱ्यांसाठी उत्साहवर्धक मानला जात आहे.

उपबाजारात शेतमालाची विक्री उघड लिलाव पद्धतीने केली जाते. चोख वजनमाप, पारदर्शक व्यवहार आणि विक्रीनंतर तातडीने हिशोबपट्टी व रक्कम अदा केली जात असल्याने शेतकऱ्यांचा बाजार समितीवरील विश्वास अधिक दृढ होत आहे. उपबाजारात ६० मेट्रिक टन क्षमतेचा वे-ब्रिज उपलब्ध असून राशीन रोडलगत बाजार आवारात १०० मेट्रिक टन क्षमतेचा वे-ब्रिज २४ तास सुरू आहे. त्यामुळे अचूक वजन व तत्काळ व्यवहाराची सोय शेतकऱ्यांना मिळत आहे.

दरम्यान, मका दरात घसरण झाल्याने बाजार समितीने हमीभावाने मका खरेदी केंद्र सुरू केले आहे. या निर्णयामुळे मका उत्पादकांना आधार मिळाला असून या उपक्रमाचे स्वागत होत आहे.

शेतकऱ्यांनी हमीभाव खरेदी केंद्रे व पारदर्शक लिलाव प्रक्रियेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सभापती तुषार जाधव, उपसभापती मनोहर ढुके व माजी सभापती आप्पासाहेब जगदाळे यांनी केले आहे.

# उसाला तुरे; गळीत हंगाम तोट्यात

पुढील वर्षी साखर कारखान्यांना उसाच्या टंचाईची शक्यता

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे** : राज्यात यंदाच्या गळीत हंगामात उसाला सर्वत्र मोठ्या प्रमाणावर तुरे आल्यामुळे उत्पादनावर विपरीत परिणाम झाला आहे. तुरे आल्याने उसाचे वजन घटले, परिणामी बहुतांश साखर कारखान्यांना अपेक्षित गाळप करता आले नाही. कमी उतारा आणि घटलेले टनाज यामुळे अनेक कारखाने नियोजित कालावधीपूर्वीच बंद करावे लागले. एकूणच हा हंगाम साखर उद्योग आणि ऊस उत्पादक शेतकरी दोघांसाठीही तोट्याचा ठरला आहे.

सन २०२६ च्या हंगामात उसाचे एकरी उत्पादन केवळ ४० ते ४२ टनांपर्यंत मर्यादित राहिल्याने गाळप उद्दिष्ट पूर्ण करण्यात अडचणी आल्या. उसाच्या पळवापळवीची समस्या, कमी क्षेत्रावर लागवड आणि साखरेच्या उताऱ्यात झालेली घट यामुळे आर्थिक ताण वाढला आहे. पुढील गळीत हंगामास अजून सुमारे आठ महिने अवधी असल्याने या कालावधीत ऊस लागवड वाढवणे हे कारखान्यांसमोरचे मोठे आव्हान ठरणार आहे.

आडसाली (जून-ऑगस्ट) आणि पूर्वहंगामी (सप्टेंबर-नोव्हेंबर) लागवडीवर बहुतांश कारखान्यांचा भर असतो. जानेवारी ते मार्चदरम्यान सुरू लागवड होते; मात्र उन्हाची तीव्रता, पाण्याची कमतरता आणि खोडकिडीचा प्रादुर्भाव यामुळे सुरू उसाकडे शेतकरी कमी वळतात. खोडवा ऊस काढून टाकण्याचे प्रमाणही वाढले आहे. या पार्श्वभूमीवर आडसाली लागवडीसाठी एकरी अनुदान, जास्त टनाज घेणाऱ्यांना बक्षीस, पूर्वहंगामी लागवडीसाठी प्रोत्साहन आणि खोडवा राखणाऱ्यांसाठी सवलती अशा योजना राबवण्याची शक्यता आहे. शेतकी विभागाकडून शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन जनजागृती केली जाणार असून, पुढील वर्षी उसाचे क्षेत्र वाढवण्यासाठी ठोस प्रयत्न करण्यात येणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत.

दरम्यान, सुरू असलेल्या हंगामामुळे कांद्याची मोठ्या प्रमाणात आवक कायम असून, आगामी काळात दरात स्थैर्य येईल का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# श्री क्षेत्र मढी पालखी सोहळ्याचे प्रस्थान



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपळवंडी** : वैशाखखेडे (पिंपळवंडी) येथून श्री क्षेत्र मढी पालखी सोहळ्याचे सोमवारी (दि. २) भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. श्री कानिफनाथ बाबा देवस्थान व सर्व नाथ भक्त वैशाखखेडे यांच्या वतीने आयोजित करण्यात येणारा हा पालखी सोहळा मागील काही वर्षांपासून परंपरेने साजरा केला जात आहे.

ओम चैतन्य बडेबाबा श्री मच्छिंद्रनाथ, श्री क्षेत्र मायबागड ते ओम चैतन्य श्री कानिफनाथ बाबा, श्री क्षेत्र मढी गड असा हा पालखी प्रवास असून यंदाही मोठ्या उत्साहात सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.

प्रस्थानापूर्वी जागृत ग्राहक संघटनेचे जुन्नर तालुका अध्यक्ष विलास वामन यांच्या हस्ते पालखी पूजन करण्यात आले. त्यानंतर टाळ-मृदुंगाच्या गजरात व भजनांच्या सुरात पालखी पिंपळवंडी येथे दाखल झाली. येथे ग्रामदैवत माळगंगा माता व पिंपळेश्वर महादेव मंदिरात पालखी भेट सोहळा संपन्न झाला. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने दर्शन घेतले. यानंतर पालखी पुढील प्रवासासाठी मार्गस्थ झाली. यावेळी पालखी प्रमुख विष्णुमहाराज माळी, राजेंद्र रोकडे, शांताराम बर्डे, सुदाम वाकचौरे, विकास काकडे, शीतल वाकचौरे, निवृत्ती फुलसुंदर, जया फुलसुंदर, पंकज फुलसुंदर, कल्पना फुलसुंदर आदी मान्यवर उपस्थित होते.

राजुरी येथे समर्थ शैक्षणिक संकुलाचे विश्वस्त वल्लभ शेळके, माऊली शेळके, माजी जिल्हा परिषद सदस्य स्नेहलताई शेळके व प्रदीप गाडेकर यांच्या वतीने पालखी सोहळ्याचे पूजन व स्वागत करण्यात आले. भक्तिमय वातावरणात पुढील प्रवासास पालखीने मार्गक्रमण केले.

# तरुणावर कोयत्याने हल्ला; तिघांना अटक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**बारामती** : तांदुळवाडी येथील एलसी कंपनी लेक परिसरात तरुणावर कोयत्याने वार करून सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम लुटल्याप्रकरणी तिघांना अटक करण्यात आली आहे. आरोपींकडून एकूण ३ लाख २४ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दि. २६ फेब्रुवारी रोजी रात्री सुमारे ८.४० वाजण्याच्या सुमारास तांदुळवाडी विमानतळ रोडलगत असलेल्या एलसी कंपनी लेक येथील मोकळ्या जागेत फिर्यादी संतोष रायनवार (बदलेले नाव) हे त्यांच्या मैत्रिणीसोबत बसले होते. त्यावेळी तोंडाला मास्क व रुमाल बांधलेल्या तिघांनी लोखंडी सत्तूर व कोयत्याचा धाक दाखवून पैशांची मागणी केली. एका आरोपीने फिर्यादीच्या डाव्या पायावर कोयत्याने वार करून त्यांना जखमी केले होते.

# खेडमध्ये सिनियर कबड्डी स्पर्धा उत्साहात



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**राजगुरूनगर** : ॲम्यच्युअर कबड्डी फाउंडेशन ऑफ महाराष्ट्र, ॲम्यच्युअर कबड्डी असोसिएशन ऑफ पुणे आणि खेड तालुका क्रीडा शिक्षक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय सिनियर कबड्डी स्पर्धा (पुरुष/महिला) २७ फेब्रुवारी ते १ मार्च २०२६ या कालावधीत राजगुरूनगर येथे उत्साहात पार पडली. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतील पुरुष गटातील २४ तर महिला गटातील १६ संघांनी स्पर्धेत सहभाग घेतला होता.

तीन दिवस रंगलेल्या या स्पर्धेत खेळाडूंनी दमदार चढाया आणि बचावाचे कौशल्य दाखवत प्रेक्षकांची दाद मिळवली. पुरुष गटात नाशिक महानगरपालिका संघाने प्रथम क्रमांक पटकावला, तर पुणे जिल्हा संघ द्वितीय आणि नंदुरबार संघ तृतीय ठरला. महिला गटात नाशिक संघाने विजेतेपद मिळवले. नांदेड संघ द्वितीय, तर कोल्हापूर संघ तृतीय क्रमांकावर राहिला. विजेत्या संघांना चषक, पदके आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

स्पर्धेचे उद्घाटन माजी आमदार दिलीप मोहिते पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य अतुल देशमुख, जिल्हा परिषद सदस्या दीप्ती भोगाडे, बाजार समितीचे सभापती विजयसिंह शिंदे पाटील, राजगुरूनगरचे नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ आदी मान्यवरांच्या उपस्थितीत झाले. स्पर्धा यशस्वी होण्यासाठी फाउंडेशनच्या सचिव भारती जगताप, अध्यक्ष राजकुमार राऊत, उपाध्यक्ष दिलीप रेटवडे, खजिनदार रामदास रेटवडे तसेच पंच, पदाधिकारी व विविध जिल्ह्यांतील मार्गदर्शक यांचे मोलाचे योगदान लाभले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्ञानेश काळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन रामदास रेटवडे यांनी केले.

युरोपच्या निर्यातीवर गंभीर परिणाम; निर्यातदारांना मोठा आर्थिक फटका

# आखाती युद्धामुळे मुंबईहून शेतमाल निर्यात ठप्प

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**पुणे** : इराण आणि इस्त्रायल यांच्यात सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीचा थेट परिणाम राज्याच्या शेतमाल निर्यातीवर झाला असून मुंबईहून विमानमार्गे आखाती देशांकडे होणारी निर्यात पूर्णपणे ठप्प झाली आहे. विमान उड्डाणे रद्द झाल्यामुळे मुंबईतून दररोज निर्यात होणाऱ्या सुमारे ४०० ते ५०० टन शेतमालाची रविवारी निर्यात होऊ शकली नाही. ही स्थिती कायम राहिल्यास शेतकरी आणि निर्यातदारांना मोठा आर्थिक फटका बसण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

राज्य कृषी पणन मंडळाच्या सूत्रांनुसार मुंबईप्रमाणेच बंगळूरू आणि दिल्ली येथूनही निर्यात केली जाते. मुंबईहून भेंडी, हिरवी मिरची, गवार, शेवगा, दुधी भोपळा, पालेभाज्या यांसह पेरू, चिक्कू, द्राक्षे आणि आंब्यांची निर्यात होत असते. मात्र, आखाती देशांकडे जाणारी विमान सेवा थांबल्याने या निर्यातीला ब्रेक लागला आहे. समुद्रमार्गे निर्यात सुरू असली तरी हवाई मार्गावरील वेग आणि ताजेपणा यांचा लाभ मिळत नसल्याने अडचणी वाढल्या आहेत. निर्यातक्षम माल देशांतर्गत बाजारात वळवावा लागल्यास दरांवर दबाव येण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

दरम्यान, द्राक्ष निर्यातीवरही परिणाम झाला आहे. दरवर्षी मार्चच्या पहिल्या आठवड्यात ३ ते ४ हजार कंटेनर द्राक्ष निर्यात होत असताना यंदा ती संख्या सुमारे ११०० कंटेनरवर आली आहे.

सुएझ कालवा मार्ग सुरू राहिल्यास अडचण टळेल; मात्र तो मार्ग बंद झाल्यास जहाजे केपटाऊन मार्गे वळवावी लागतील, ज्यामुळे वाहतूक खर्च वाढू शकतो. केंद्र सरकारच्या 'ग्रेपनेट' प्रणालीच्या माहितीनुसार देशातून आतापर्यंत १०९९ कंटेनर म्हणजे सुमारे १४,६३० मेट्रिक टन द्राक्ष निर्यात झाली असून ती प्रामुख्याने नेदरलँडस, जर्मनी, इंग्लंड, बेल्जियम, नॉर्वे आणि स्पेन येथे झाली आहे. यापूर्वी युरोपकडे दररोज ५० ते १०० टन शेतमाल जात होता; मात्र सध्या तो आकडा २० ते २५ टनांवर आला आहे. इंधनखर्च आणि वळण मार्गांमुळे हवाई निर्यात नगण्य झाल्याचे स्पष्ट होत आहे.

# जमिनीच्या वादातून चुलत भावाला गाडीखाली चिरडले

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे** : हवेली तालुक्यातील भवरापूर येथे जमिनीच्या वादातून चुलत भावालाच कारखाली चिरडून ठार मारल्याची धक्कादायक घटना सोमवारी (दि. २ मार्च) उघडकीस आली.

भांडणातून झालेल्या मारामारीनंतर पोलिस ठाण्यात तक्रार देऊन दुचाकीवरून घरी परतत असताना पाठलाग करून ही घटना घडवून आणल्याचा आरोप आहे. वैद्यकीय तपासणीसाठी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करण्यासाठी जात असताना पाठीमागून कारने जोरदार धडक देण्यात आली. या प्रकरणी उरुळीकांचन पोलिसांनी चुलत भावासह त्याच्या मित्राला अटक केली आहे.

महेश लक्ष्मण साठे (वय ३२, रा. भवरापूर, ता. हवेली) असे मृत तरुणाचे नाव आहे. या प्रकरणी अक्षय दशरथ साठे (वय ३२, रा. भवरापूर) आणि गोकुळ नाना कोकरे (वय २३, रा. आष्टापूर, ता. हवेली) यांना अटक करण्यात आली आहे. दोघांनी संगनमताने कारने धडक देत खून केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मृताचे वडील लक्ष्मण सोपान साठे (वय ५८) यांनी उरुळीकांचन पोलिस ठाण्यात फिर्याद दिली असून, घटनेनंतर वातावरणात तणाव आहे.

## सारांश वृत्त

### चार विमानतळांवर २५० हून उड्डाणे रद्द

**नवी दिल्ली:** मध्य पूर्वेतील संघर्षामुळे मंगळवारी दिल्ली, मुंबई, बंगळुरू आणि चेन्नई विमानतळांवर २५० हून अधिक उड्डाणे रद्द करण्यात आली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले. अमेरिका, इस्रायल आणि इराणमधील वाढत्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर विमान कंपन्यांनी उड्डाणे रद्द केल्याने चौथ्या दिवशीही विमान वाहतूक विस्कळीत राहिली. अधिकाऱ्यांनी सांगितले की, दिल्ली विमानतळावर ८० उड्डाणे रद्द करण्यात आली तर मुंबई विमानतळावर १०७ उड्डाणे रद्द करण्यात आली.

### बंगालमध्ये भाजपचे हिंदू ऐक्याचे आवाहन

**कोलकाता** : पश्चिम बंगाल विधानसभेतील विरोधी पक्षनेते शुभेंदू अधिकारी यांनी मंगळवारी मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या मतदारसंघातील भबानीपूर येथे 'डोल यात्रा' उत्सव आणि मिरवणुकीत भाग घेतला आणि हिंदूंमध्ये ऐक्याचे आवाहन केले. भबानीपूर येथील सनातन हिंदू समाजाच्या रॅलीत भाग घेताना, भाजपचे ज्येष्ठ नेते म्हणाले की, देशात धर्मनिरपेक्षतेसारख्या शब्दांचा चुकीचा अर्थ लावला जात आहे. या देशाचे नाव हिंदुस्तान आहे. याचा अर्थ हिंदू आणि इतर समुदायांचे लोक युगानुयुगे येथे शांततेने राहत आहेत, असे ते म्हणाले.

### प्रत्येक प्रदेशाचा विकास हवा

**जम्मू** : जम्मू आणि काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी सांगितले की, २०४७ पर्यंत विकसित भारताचे स्वप्न तेव्हाच प्रत्यक्षात येऊ शकते जेव्हा विकास देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचेल, असे प्रतिपादन करून त्यांनी सांगितले की, काही राज्ये किंवा प्रदेशांपुरती मर्यादित प्रगती ही "स्वप्न आणि घोषणा" राहील. विकसित भारतसाठी प्रशासनात परिवर्तन आणि प्रशासन सुधारणे यावरील राष्ट्रीय परिषदेला संबोधित करत अब्दुल्ला बोलत होते. संपूर्ण भारताचा विकास झाला तरच विकसित भारत हे वास्तव ठरेल, असे ते म्हणाले. राष्ट्रीय दृष्टिकोन प्रत्यक्षात येण्यासाठी प्रत्येक प्रदेशाने प्रगती पाहिली पाहिजे यावर त्यांनी भर दिला.

## खामेनी हत्येनंतर अमेरिकेची धावपळ, इराणचे प्रतिहल्ले तीव्र

# मध्यपूर्वेतील संघर्ष पराकोटीला पोहोचला

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या हत्येनंतर मध्यपूर्वेतील संघर्ष अभूतपूर्व पातळीवर पोहोचला असून इस्रायल आणि अमेरिका यांनी तेहरानसह विविध इराणी शहरांवर हल्ल्यांची मालिका सुरू ठेवली आहे. मात्र या कारवाईनंतरही इराणने आपले मनोबल अबाधित असल्याचा दावा करत जलद प्रतिहल्ले सुरूच ठेवले आहेत. इस्रायलपुरते मर्यादित न राहता इराणने मध्यपूर्वेतील इतर देशांतील अमेरिकन हितसंबंधांनाही लक्ष्य करण्यास सुरुवात केली आहे.

जेरुसलेममधील अमेरिकन दूतावासाने आपल्या नागरिकांना तत्काळ बाहेर काढण्यास असमर्थता दर्शवली आहे. "सध्या आम्ही तुम्हाला बाहेर काढण्याच्या स्थितीत नाही," असे स्पष्ट करत दूतावासाने नागरिकांना इस्रायली पर्यटन मंत्रालयाशी संपर्क साधण्याचा सल्ला दिला आहे. या निर्णयामुळे तेथील अमेरिकन नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. दरम्यान, इराणी ड्रोन हल्ल्यात अमेझॉन या अमेरिकन कंपनीच्या संयुक्त अरब अमिरातीतील डेटा सेंटरचे नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे. या हल्ल्यामुळे मध्यपूर्वेतील अमेझॉनच्या क्लाउड सेवा विस्कळीत झाल्या. बहरीनमधील अमेझॉनच्या एका सुविधेलाही फटका बसल्याचे वृत्त आहे. सुरक्षा धोक्याच्या पार्श्वभूमीवर अमेरिकेने सौदी अरेबिया येथील आपल्या कॉन्सुलर सेवा तात्पुरत्या निलंबित केल्या आहेत. खामेनी यांच्या हत्येनंतर झालेल्या ड्रोन हल्ल्यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याचे सांगितले जाते. कॅनडानेही सौदी अरेबियातील आपला दूतावास तात्पुरता बंद केला आहे. अमेरिकेने इराक मधील आपल्या दूतावासातील सर्व सरकारी कर्मचाऱ्यांना देश सोडण्याचे निर्देश दिले आहेत. प्रवास सल्लागार जारी करत नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. कुवेतमध्येही परिस्थिती तणावपूर्ण असून तेथील अमेरिकन दूतावास अनिश्चित काळासाठी बंद करण्यात आला आहे. इराणी हल्ल्यानंतर दूतावासातून धूर निघताना दिसल्याचे वृत्तांमध्ये म्हटले आहे.

बहरीनमधील अमेरिकेच्या हवाई तळावर इराणने मोठ्या प्रमाणावर क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले केल्याचे सांगितले जात आहे. प्राथमिक माहितीनुसार, सुमारे २० ड्रोन आणि तीन क्षेपणास्त्रांचा या हल्ल्यात समावेश होता. कुवेतमध्ये चुकून तीन अमेरिकन लढाऊ विमाने पाडल्याचीही घटना घडल्याचे वृत्त आहे.

संघर्ष अधिक चिघळण्याची शक्यता निर्माण करत इराणने जगातील सर्वात महत्त्वाचा कच्च्या तेलाचा पुरवठा मार्ग असलेल्या होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्याची घोषणा केली आहे. या निर्णयामुळे अमेरिकेच्या मित्र राष्ट्रांसह जागतिक ऊर्जा बाजाराला मोठा धक्का बसण्याची भीती व्यक्त होत आहे.

दरम्यान, अमेरिकेने मध्यपूर्वेतील सर्व देशांना संयुक्त निवेदन जारी करत आपल्या नागरिकांना त्या देशांमधून बाहेर पडण्याचे आवाहन केले आहे. खामेनी यांच्या हत्येनंतर इराणमध्ये सत्तांतर होईल आणि सरकारविरोधी चळवळ उभी राहील, अशी अपेक्षा होती. मात्र, सध्याच्या घडीला तसे संकेत दिसून येत नसल्याने संघर्ष दीर्घकाळ चालण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## भारतीय विद्यार्थ्यांना कोम येथे हलवले



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अमेरिका आणि इस्रायलने इराणवर केलेल्या संयुक्त हल्ल्यांनंतर तेहरानमधील विविध विद्यापीठांमध्ये शिक्षण घेणाऱ्या २०० हून अधिक भारतीय विद्यार्थ्यांना सुमारे १४० किमी दक्षिणेस असलेल्या तुलनेने सुरक्षित कोम शहरात हलवण्यात आले. मंगळवारी सकाळी विद्यार्थ्यांना बसमधून स्थलांतरित करण्यात आले.

जम्मू आणि काश्मीरमधील बहुसंख्य विद्यार्थी तेहरान विद्यापीठ वैद्यकीय विज्ञान, शाहिद बेहेश्ती वैद्यकीय विज्ञान विद्यापीठ तसेच इराण विद्यापीठ वैद्यकीय विज्ञान येथे शिक्षण घेत आहेत. काही विद्यार्थी अभियांत्रिकी शाखेतही शिक्षण घेत आहेत.

ऑल इंडिया मेडिकल स्टुडंट्स असोसिएशनचे राष्ट्रीय प्रतिनिधी डॉ. मोहम्मद मोमीन खान यांनी सांगितले की, तेहरानमधील भारतीय दूतावासाने स्थलांतराची संपूर्ण व्यवस्था केली.

विद्यार्थ्यांना पाच बसमधून हलवण्यात आले असून ते कोम येथे पोहोचले आहेत. इराणमधील इतर भागांत असलेल्या विद्यार्थ्यांना हलवण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. यात अभियांत्रिकीचा विद्यार्थी सय्यद फाझिल याचाही समावेश आहे. कोम येथे पोहोचल्यानंतर आम्हाला सुरक्षित वाटत आहे, असे त्याने सांगितले. सरकारच्या हस्तक्षेपाची मागणी करणाऱ्या असोसिएशनने भारतीय दूतावासाचे आभार मानले आहेत. दरम्यान, २८ फेब्रुवारीपासून इराण व आखाती प्रदेशातील अनेक देशांवरील हवाई मार्ग बंद आहेत.

## सीबीएसईच्या परीक्षा पुढे ढकलल्या

■ दैनिक राज्य लोकतंत्र




**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील बिघडलेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ (सीबीएसई) ने ५ आणि ६ मार्च रोजी होणाऱ्या दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे. अधिकाऱ्यांनी मंगळवारी ही माहिती दिली.

मध्यपूर्वेतील बहरीन, इराण, कुवेत, ओमान, कतार, सौदी अरेबिया आणि युएई या देशांतील काही भागांमध्ये सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचे परीक्षा नियंत्रक संयम भारद्वाज यांनी स्पष्ट केले. "५ मार्च (गुरुवार) आणि ६ मार्च (शुक्रवार) रोजी नियोजित १०वी आणि १२वीच्या परीक्षा पुढे ढकलण्यात येत आहेत. नव्या तारखा नंतर जाहीर केल्या जातील. ५ मार्च रोजी परिस्थितीचा आढावा घेतला जाईल, असे त्यांनी सांगितले.

यापूर्वी २ मार्च रोजी होणारी परीक्षा देखील पुढे ढकलण्यात आली होती. २८ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या इराण-इस्रायल संघर्षानंतर परिस्थिती अधिक गंभीर झाली आहे.

दरम्यान, अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणवरील कारवाई आवश्यक असेल तोपर्यंत सुरू ठेवण्याचे संकेत दिल्याचे वृत्त आहे. संघर्षाच्या पार्श्वभूमीवर सीबीएसईने विद्यार्थ्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देत परीक्षा पुढे ढकलण्याचा निर्णय घेतला आहे.

## खामेनी यांच्या हत्येबाबत मौन का? राहुल गांधी

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** अमेरिका आणि इस्रायलने केलेल्या हल्ल्यात इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या हत्येबाबत केंद्र सरकार मौन बाळगत असल्याचा आरोप करत काँग्रेसने मंगळवारी सरकारवर टीका केली.

पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या हत्येचे समर्थन केले आहे का, असा थेट प्रश्न उपस्थित केला. "पंतप्रधान मोदींनी याबाबत स्पष्ट भूमिका मांडली पाहिजे. जागतिक व्यवस्थेची व्याख्या करण्यासाठी एखाद्या राष्ट्रप्रमुखाच्या हत्येला ते समर्थन देतात का? मौन बाळगल्याने भारताचे जागतिक स्थान कमी होत आहे," असे त्यांनी 'एक्स'वरील पोस्टमध्ये म्हटले आहे.

काँग्रेसने पश्चिम आशियातील परिस्थितीबाबत गंभीर चिंता व्यक्त केली आहे. अमेरिका, इस्रायल आणि इराणमधील वाढत्या शत्रुत्वामुळे आधीच नाजूक असलेला प्रदेश व्यापक संघर्षाकडे ढकलला जात असल्याचा इशारा देण्यात आला. दोन्ही बाजूंनी करण्यात आलेल्या हल्ल्यांचा निषेध केला पाहिजे, असेही गांधी यांनी नमूद केले.

"जवळजवळ एक कोटी भारतीयांसह कोट्यवधी लोक अनिश्चिततेचा सामना करत आहेत. सुरक्षेच्या चिंता खऱ्या असल्या तरी सार्वभौमत्वाचे उल्लंघन करणारे हल्ले संकट अधिकच वाढवतील. इराणवरील एकतर्फी हल्ले तसेच इतर मध्यपूर्व देशांवर इराणचे हल्ले यांचा निषेध केला पाहिजे. हिंसाचाराला उत्तर हिंसाचार नसून संवाद आणि संयम हाच शांततेचा मार्ग आहे," असे त्यांनी स्पष्ट केले.

सरकारवर टीका करताना गांधी म्हणाले की भारताने आंतरराष्ट्रीय कायदा आणि मानवी जीवनाच्या संरक्षणाबाबत नैतिक स्पष्टता दाखवली पाहिजे. "आपले परराष्ट्र धोरण सार्वभौमत्व आणि वादांचे शांततापूर्ण निराकरण यावर आधारित आहे आणि ते सातत्यपूर्ण राहिले पाहिजे," असे त्यांनी नमूद केले.

यापूर्वीही गांधी यांनी पश्चिम आशियातील लष्करी तणावाच्या पार्श्वभूमीवर तेथील भारतीयांच्या सुरक्षेसाठी केंद्र सरकारने सक्रिय उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली होती.

## होर्मुझ सामुद्रधुनीतील तेलवाहतूक कोसळली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** इराण आणि अमेरिका यांच्यात सुरू असलेल्या संघर्षाचा जागतिक तेलपुरवठ्यावर गंभीर परिणाम होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. मार्च महिन्यात होर्मुझची सामुद्रधुनी मार्गे होणारी तेलटँकर वाहतूक ८० टक्क्यांहून अधिक घटल्याचे वृत्त आहे. शेकडो टँकर दोन्ही बाजूंना अडकून पडल्याने या महत्त्वाच्या जलमार्गात मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे.

मीडिया अहवालांनुसार, विंडवर्ड आणि केप्लरच्या आकडेवारीनुसार १ मार्च रोजी २.८ दशलक्ष बॅरल कच्चे तेल वाहून नेणारे केवळ तीन टँकर सामुद्रधुनीतून गेले.

२ मार्च रोजी फक्त एक लहान टँकर आणि एक लहान मालवाहू जहाज या मार्गाने पार झाले. सामुद्रधुनीच्या दोन्ही टोकांना सुमारे ७०६ बिगर-इराणी टँकर अडकले असून त्यापैकी ३३४ कच्चे तेल वाहून नेणारे आहेत.

ऊर्जा विश्लेषण संस्थेच्या अंदाजानुसार दररोज सुमारे १५ दशलक्ष बॅरल कच्चे तेल, म्हणजेच जागतिक पुरवठ्याच्या जवळपास २० टक्के तेल, होर्मुझच्या सामुद्रधुनीतून वाहतूक होते.

इराण या सामुद्रधुनीच्या उत्तरेस असून सौदी अरेबिया, कुवेत, इराक, कतार, बहरीन आणि संयुक्त अरब अमिराती यांसारखे देश या मार्गाने तेल व वायू निर्यात करतात.

इराणी कमांडर-इन-चीफचे सल्लागार इब्राहिम जबरी यांनी "होर्मुझची सामुद्रधुनी बंद करण्यात आली आहे. जर कोणी ती ओलांडण्याचा प्रयत्न केला तर क्रांतिकारी गार्ड्स आणि नौदल संबंधित जहाजांना आग लावतील," अशी धमकी दिली आहे.

या पार्श्वभूमीवर जागतिक बाजारात पेट्रोल, डिझेल आणि एलपीजीच्या किमती वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

## एअर इंडियाने आणले १४९ प्रवासी सुरक्षित परत

# दुबई-दिल्ली विशेष उड्डाण भारतात

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**नवी दिल्ली :** पश्चिम आशियातील सुरू असलेल्या संघर्षाच्या पार्श्वभूमीवर महत्त्वपूर्ण घडामोडीत एअर इंडियाने मंगळवारी दुबई ते नवी दिल्ली असे विशेष उड्डाण चालवून १४९ अडकलेल्या प्रवाशांना सुरक्षित परत आणले. गेल्या तीन दिवसांत पश्चिम आशियातून प्रवाशांना घेऊन येणारे हे पहिले भारतीय विमान कंपनीचे उड्डाण ठरले. एअर इंडियाचे विमान एआय ९१६ डी सकाळी १०.५८ वाजता इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळ (टर्मिनल ३) येथे दाखल झाले. या उड्डाणात आठ कर्मचाऱ्यांसह एकूण १४९ प्रवासी होते.

याशिवाय, दुबईत अडकलेल्या एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्सप्रेसच्या १४३ कॉकपिट व केबिन क्रू सदस्यांना विशेष विमानाद्वारे सुरक्षितपणे दिल्लीला आणण्यात आले, अशी माहिती कंपनीने निवेदनाद्वारे दिली. विशेष उड्डाणांबाबत पूर्वसूचना देण्यात आलेली नव्हती. एका सूत्रानुसार, दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून उड्डाणासाठी मर्यादित वेळ उपलब्ध झाल्याची माहिती मिळाल्यानंतर तत्काळ हा निर्णय घेण्यात आला.

या उड्डाणात केवळ एअर इंडियाचेच ते प्रवासी होते, ज्यांनी तिकिटे आरक्षित केली होती; मात्र संघर्षामुळे त्यांचा प्रवास पुढे ढकलला गेला होता. ऑपरेशन्स कंट्रोल सेंटर आणि सहाय्यक पथके असामान्य परिस्थितीत उड्डाणे सुरळीत पार पाडण्यासाठी अहोरात्र कार्यरत असल्याचे एअरलाइनने स्पष्ट केले.

"या महत्त्वाच्या कामांसाठी सहकार्य केल्याबद्दल आम्ही भारत सरकार, नागरी विमान वाहतूक महासंचालनालय आणि दुबईतील स्थानिक अधिकाऱ्यांचे आभारी आहोत. परिस्थितीवर आम्ही सतत लक्ष ठेवून आहोत आणि परवानगी मिळताच आणखी उड्डाणे सुरू करण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्कात आहोत," असे निवेदनात म्हटले आहे.

दरम्यान, विमानतळावर पोहोचलेल्या प्रवाशांनी संघर्षामुळे दुबईतील वाढत्या राहणीमान खर्चाबद्दल चिंता व्यक्त केली. उड्डाणे रद्द झाल्याने आर्थिक फटका बसल्याचे त्यांनी सांगितले. एका प्रवाशाने, "एअर इंडियाने आम्हाला पूर्ण मार्गदर्शन केले. स्थानिक प्रशासनही मदत करत आहे," असे नमूद केले. दुसऱ्या प्रवाशाने परतीचे उड्डाण २८ फेब्रुवारी रोजी रद्द झाल्याचे सांगत, दुबईत अडकलेल्या इतर भारतीय पर्यटकांनाही लवकरात लवकर परत आणण्याची विनंती केली.

## रशियाकडून तेल आयात वाढवण्याचा पर्याय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** इराण संकटाच्या पार्श्वभूमीवर होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्याने जागतिक ऊर्जा बाजारात तणाव वाढला आहे. कच्च्या तेलाच्या किमती चढू लागल्या असून भारतासह आयातदार देशांनी पर्यायी पुरवठा मार्गांचा विचार सुरू केला आहे. भारतीय अधिकाऱ्यांनी सध्या देशात पुरेसे तेलसाठे उपलब्ध असल्याचे सांगितले असले तरी, गरज पडल्यास पर्याय खुले ठेवले जातील, असे स्पष्ट केले आहे.

अमेरिकेसोबत व्यापार करार झाल्यानंतरही भारताने फेब्रुवारी महिन्यात रशिया कडून सर्वाधिक कच्चे तेल आयात केले. सौदी अरेबिया हा भारतासाठी दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा पुरवठादार ठरला.

डेटा व विश्लेषण सेवा संस्था केप्लरच्या अहवालानुसार, भारत दररोज सुमारे ६ ते ७ लाख बॅरल कच्चे तेल सौदी अरेबियातून आयात करत आहे. गेल्या सहा वर्षांत या आयातीत सातत्य राहिले आहे. तज्ज्ञांच्या मते, मागील दोन ते तीन महिन्यांत काही तेल कंपन्यांनी रशियावरील अवलंबित्व कमी करण्याचा प्रयत्न केल्याने पश्चिम आशियातून आयात वाढली. सौदी अरेबियातून आयात सुमारे ३० टक्क्यांनी वाढल्याचेही नमूद करण्यात आले आहे.

फेब्रुवारीमध्ये भारताची एकूण तेल आयात दररोज १ दशलक्ष बॅरलपेक्षा अधिक झाली. जानेवारीमध्ये ती १.१ दशलक्ष बॅरल आणि डिसेंबरमध्ये १.२ दशलक्ष बॅरल होती. रशियाकडील आयात काही प्रमाणात घटली असली तरी तो अद्याप भारताचा सर्वात मोठा पुरवठादार आहे. केप्लरचे प्रमुख संशोधन विश्लेषक सुमित रिटोलिया यांच्या मते, इराक, सौदी अरेबिया, यूएई आणि कुवेत यांसारख्या आखाती देशांकडून येणाऱ्या तेलाच्या प्रमाणात वाढ झाली आहे. मार्चमध्ये आयात पॅटर्नमध्ये आणखी बदल होण्याची शक्यता आहे, कारण अंदाजे २.५ ते २.७ दशलक्ष बॅरल भारतीय तेल होर्मुझ सामुद्रधुनीत अडकले आहे.

दरम्यान, इराण आणि इस्रायल यांच्यातील संघर्षामुळे शिपिंग क्षेत्रावरही परिणाम झाला आहे. ओमानजवळ दोन भारतीय जहाजांवर हल्ला झाल्याची घटना घडली असून त्यात तीन भारतीयांचा मृत्यू आणि अनेक जखमी झाल्याचे वृत्त आहे.

### लंडन-मुंबई भाडे २.९ लाखांवर

**नवी दिल्ली :** अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील संघर्ष तीव्र झाल्याने आखाती प्रदेश युद्धाच्या छायेत गेला असून त्याचा थेट फटका आंतरराष्ट्रीय विमान वाहतुकीला बसला आहे. भारताकडे येणाऱ्या उड्डाणांच्या भाड्यांमध्ये अभूतपूर्व वाढ झाली आहे. लंडन-मुंबई या थेट उड्डाणासाठी युरोपियन विमान कंपनीच्या इकॉनॉमी क्लासचे भाडे तब्बल २.९ लाख रुपयांवर पोहोचले, तर बिझनेस क्लाससाठी सुमारे ९ लाख रुपये आकारले जात असल्याची माहिती समोर आली आहे.

## तामिळनाडूत पेन्शनसोबत अतिरिक्त २००० रुपयांचा लाभ

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**चेन्नई :** तामिळनाडूमध्ये आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एम. के. स्टालिन यांच्या नेतृत्वाखालील द्रविड मुनेत्र कळघम (डीएमके) सरकारने सामाजिक सुरक्षा योजनांअंतर्गत मोठी आर्थिक मदत जाहीर केली आहे. सरकारने सांगितले की मागास आणि वंचित घटकांतील लाभार्थ्यांच्या खात्यात मासिक पेन्शनसोबतच अतिरिक्त २००० रुपये जमा करण्यात आले आहेत. या योजनेत ज्येष्ठ नागरिक, विधवा, ट्रान्सजेंडर व्यक्ती आणि दिव्यांगांचा समावेश आहे.

सरकारने 'कलैग्नार मगलिर उरिमाई थिट्टम' या योजनेचा विस्तार करून ती आता दुर्बल घटकांपर्यंत पोहोचवली असल्याचे स्पष्ट केले. सुरुवातीला ही योजना केवळ महिलांसाठी जाहीर करण्यात आली होती.

अधिकृत आकडेवारीनुसार, सामाजिक सुरक्षा योजनांखाली २९ लाखांहून अधिक ज्येष्ठ नागरिक आणि विधवांना दरमहा ३२०० रुपये दिले जात आहेत, तर ५ लाखांहून अधिक दिव्यांगांना ३५०० रुपयांची मदत देण्यात येत आहे. याशिवाय, २ लाख दिव्यांग लाभार्थ्यांना ४०० रुपयांची अतिरिक्त रक्कमही प्रदान करण्यात आली आहे.

## शाळेवरील हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या मुलींच्या अंत्यसंस्काराचे छायाचित्र प्रसिद्ध

# 'लहान देवदूतांच्या लहान कबरीं'चे हृदयद्रावक चित्र

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**तेहरान :** अमेरिका-इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेल्या बॉम्बस्फोट, क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्यांमध्ये सामान्य नागरिकांचे हाल वाढत असताना दक्षिण इराणमधील मीनाब येथून एक अत्यंत वेदनादायक चित्र समोर आले आहे. प्राथमिक शाळेवर झालेल्या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या शाळकरी मुलींच्या अंत्यसंस्कारासाठी खोदलेल्या कबरींचा फोटो इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांनी सामाजिक माध्यमांवर पोस्ट केला आहे. या छायाचित्राला "लहान देवदूतांच्या लहान कबरी" असे संबोधण्यात आले आहे.

चित्रात पांढऱ्या खडूने क्रमांक लिहिलेल्या लहान कबरींची रांग दिसत आहे. काही ठिकाणी नव्या कबरी खोदण्याचे काम सुरू असून शोकाकुल कुटुंबीय आणि स्थानिक नागरिक जवळ उभे असल्याचे दिसते. मीनाब येथील प्राथमिक शाळेवर झालेल्या बॉम्बहल्ल्यात १६० हून अधिक विद्यार्थिनींचा मृत्यू झाल्याचा दावा इराणी अधिकाऱ्यांनी केला आहे. काही अहवालांनुसार मृतांचा आकडा १६५ पर्यंत पोहोचल्याचे म्हटले जाते. या स्फोटात अनेक मुलींचे मृतदेह विद्रूप झाल्याचेही अराघची यांनी नमूद केले आहे.

भारतातील इराणी दूतावासानेही या घटनेबाबत पोस्ट करत "लहान देवदूतांसाठी लहान कबरी" असा उल्लेख केला. "मीनाबमधील प्राथमिक शाळेतील विद्यार्थी आता स्वर्गात एकत्र आहेत," असे त्या पोस्टमध्ये म्हटले आहे. इराणच्या सरकारी वृत्तसंस्थेनुसार या हल्ल्यात किमान ९६ जण जखमी झाले आहेत. घटनास्थळावरून समोर आलेल्या व्हिडिओंमध्ये बचाव कर्मचारी कोसळलेल्या काँक्रीटच्या स्लॅब्स आणि ढिगाऱ्यातून शोधकार्य करताना दिसतात. ढिगाऱ्यातून शाळेच्या बॅगा आणि पुस्तके बाहेर काढली जात असल्याचे दृश्य हृदय पिळवटून टाकणारे आहे. स्थानिक प्रशासनाने मृतांची ओळख पटविण्याचे आणि जखमींवर उपचार करण्याचे काम युद्धपातळीवर सुरू केले आहे.

इराणने या हल्ल्याचा मुद्दा संयुक्त राष्ट्रसंघात उपस्थित करत हा नागरिकांवर जाणीवपूर्वक केलेला हल्ला असून तो युद्धगुन्हा आणि मानवतेविरुद्धचा गुन्हा असल्याचा आरोप केला आहे. दुसरीकडे, इस्रायली संरक्षण दल यांनी इराणी अधिकाऱ्यांनी उल्लेख केलेल्या भागात कोणताही हल्ला केल्याची माहिती नसल्याचे म्हटले आहे. अमेरिकन लष्कराने नागरिकांच्या जीवितहानीबाबतच्या अहवालांचा आढावा घेत असल्याचे स्पष्ट केले आहे.

दरम्यान, आग्नेय इराणमधील केरमन येथे हवाई तळावर झालेल्या हल्ल्यात किमान १३ इराणी सैनिक ठार झाल्याचे स्थानिक माध्यमांनी वृत्त दिले आहे. केरमन हे तेहरानपासून सुमारे ८०० किलोमीटर अंतरावर असून तेथील हवाई तळ लष्करी हेलिकॉप्टरसाठी ओळखला जातो. तस्निम या अर्ध-सरकारी वृत्तसंस्थेसह इतर माध्यमांनी या हल्ल्याचे वृत्त दिले आहे.

सततच्या प्रतिहल्ल्यांमुळे आणि वाढत्या तणावामुळे संपूर्ण प्रदेश अस्थिरतेच्या छायेत असून सर्वाधिक फटका सामान्य नागरिकांना बसत आहे. मीनाबमधील कबरींचे चित्र या संघर्षाच्या मानवी किंमतीची भीषण जाणीव करून देणारे ठरत आहे.